विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे | अंक आठवा | ऑगस्ट २०२२

## संघटनेच्या वाटचालीची ३३ वर्ष

३५० शाखांच्या माध्यमातून काम सुरू : २०२२

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कामाची दखल

त्रिदशकपुर्ती : २०१९

सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा : २०१७

जादूटोणा विरोधी कायदा मंजूर २०१३

डॉ. नरेंद्र दाभोलकर खून २० ऑगस्ट २०१३

द्विदशकपुर्ती : २००९

कायद्यांसाठी पाठपुरावा

उपक्रमशिलता, प्रबोधन

प्रश्नांचे निवारण सुरु

दशकपुर्ती १९९९

कार्यपद्धती विकसित

प्रश्नांची वैचारिक मांडणी

अंधश्रद्धेचा प्रश्न अंजेड्यावर

स्थापना : ९ ऑगस्ट १९८९

## स्मृतिदिन ९ वा

पोलिसांकडून CBI कडे तपास २०१४


एका आरोपीला अटक २०१६

दोन आरोपींना अटक २०१८

दोन आरोपींना अटक २०१९

५ जणांविरोधात आरोपपत्र दाखल सप्टेंबर २०२१

सुनावणी सुरु



# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## संघटनेची वाटचाल : डॉक्टरांना आठवताना



जादुटोणा विरोधी कायद्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर व माधव बावगे यांचे लातूरमध्ये १० दिवस उपोषण झाले. यावेळी सिनेअभिनेते निळूभाऊ फुले, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, ॲड. मनोहरराव गोमारे




महिला जाहिरनामा परिषदेत डावीकडून डॉ.नरेंद्र दाभोलकर, जेष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू, मेधा पाटकर, प्रा. एन. डी. पाटील, ॲड. के. एन. देशमुख




परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मा. प्रा. पुष्पा भावे डावीकडून डॉ.नरेंद्र दाभोलकर, अनिरूद्ध जाधव, ॲड. मनोहरराव गोमारे, जनार्दन वाघमारे, विक्रम काळे




युवा संकल्प परिषदेत बोलताना डॉ.नरेंद्र दाभोलकर डावीकडून माधव बावगे, अविनाश पाटील , प्रा. डी. डी. पवार, प्रा. एन. डी. पाटील




जादूटोणा विरोधी कायद्याच्या मागणीसाठी नागपूर येथे स्वरक्ताने पत्र लिहिताना गौरव आळणे आणि कायकर्ते. भूमिका मांडताना डॉ. नरेंद्र दाभोलकर



जादूटोणा विरोधी कायद्याच्या मागणीसाठी स्वरक्ताने पत्र लिहिताना डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कायकर्ते.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

• संपादक
डॉ. नितीन शिंदे

• कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड

• सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर

• सदस्य
डॉ. मांतेश हिरेमठ
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
डॉ. सुशील मेश्राम
डॉ. अरुण शिंदे

• व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर

• सदस्य
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

• सल्लागार मंडळ
डॉ. प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार
किशोर बेडकिहाळ

**वार्षिक वर्गणी**

**४००** रु. (व्यक्तीसाठी) **५००** रु.(संस्थेसाठी)

• **वर्गणी पाठविण्याची सुविधा** :
महाराष्ट्र अंनिस अंतर्गत प्रकाशन संस्थेच्या खालील बँक खात्यावर वर्गणीची रक्कम पाठवू शकता.
**विवेक जागर संस्था,**
**आय.सी.आय.सी.आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे**
**खाते नंबर** : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
● वर्गणीची रक्कम ऑनलाईन पाठविल्याचा स्क्रीनशॉट अजय भालकर ९३५९०८०८२० या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवावा. लगतच्या अंकासोबत वर्गणीची पावती पाठविली जाईल.

**मुखपृष्ठ** : विशाल विमल
सचिन भोसले

**स्वागतमूल्य** : ₹ २५/-

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका



आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष दुसरे । अंक आठवा**
**ऑगस्ट २०२२**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| • **संपादकीय** | | २ |
| • **अभिवादन** | | |
| प्रबोधनाच्या कृतिशील चळवळीचे प्रवर्तक : डॉ दाभोलकर | उत्तम कांबळे | ३ |
| प्रिय डॉक्टर... | राजाभाऊ शिरगुप्पे | ६ |
| डॉ. नरेंद्र दाभोलकर : एक निरंतर तेवणारी ज्योत | सुशीला मुंडे | ७ |
| माझी विवेकप्रेरणा : डॉ. नरेंद्र दाभोलकर | डॉ. शशांक कुलकर्णी | ९ |
| • **कविता** | | |
| न संपलेला माणूस | डॉ. श्यामसुंदर मिरजकर | १२ |
| • **प्रासंगिक** | | |
| हव्यास गुप्तधनाचा | संजय बनसोडे | १३ |
| • **संतांचिये द्वारी** | | |
| पुरोगामी विचाराचा प्रतिभासंपन्न संतकवी : सावता माळी | डॉ. जी. पी. माळी | १५ |
| • **बुवाबाजी** | | |
| काळ्या घोड्याची नाल | विलास निंबोरकर | १८ |
| • **समन्वयाचे बांधकाम** | | |
| वर्तमानकाळ आणि समन्वयाचे सूत्र | डॉ. बाळू दुगडूमवार | २१ |
| • **महिलाविश्व** | | |
| अंधश्रद्धा आणि विषमता यांचे बदलते संदर्भ | डॉ. माधुरी झाडे | २४ |
| • **पुस्तक परिचय** | | |
| कल्चरली करेक्ट | प्रा. डॉ. विजया पवार | २७ |
| • सायन्स फॉर सोसायटी : उत्तराखंड | गिरीश आर्या | ३० |
| • कार्याध्यक्ष संवाद | माधव बावगे | ३२ |
| • महाराष्ट्र अंनिसची खबरबात | अनिल शोभना वसंत | ३३ |
| • विवेक-विज्ञान शब्दकोडे | उत्तम जोगदंड | ३६ |


सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

संपादकीय

# अंनिसच्या चळवळीतला लोकसहभाग वाढला पाहिजे...

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती दि. ९ ऑगस्ट २०२२ रोजी आपला तेहत्तीसावा वर्धापन दिन साजरा करीत आहे आणि दुसऱ्या बाजूला याच महिन्यात दि. २० ऑगस्ट रोजी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन आहे. डॉ. दाभोलकरांच्या खुनाला नऊ वर्षांचा काळ उलटून गेला तरीही अद्याप त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झालेली नाही. या दिरंगाईबद्दल निषेध नोंदवत तपासाचा पाठपुरावा करीत अंधश्रद्धा निर्मूलनाची लढाई पूर्वीपेक्षा अधिक जोमाने आणि निकराने आपण लढवत आहोत. डॉक्टरांनी अत्यंत दूरदृष्टिने स्थापन केलेल्या समितीने त्यांच्या हौताम्यानंतर समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी शासनाच्या सहकार्याने 'जादूटोणा विरोधी' आणि 'सामाजिक बहिष्कार विरोधी' असे दोन महत्त्वाचे कायदे मंजूर करून घेतले. पुरोगामी चळवळींच्या इतिहासामध्ये एखाद्या संघटनेने कोणतेही राजकीय अथवा आर्थिक पाठबळ नसताना समाजोपयोगी कायदे मंजूर करून घेतलेलं बहुतेक हे एकमेव उदाहरण असावे. अर्थात त्यासाठी डॉक्टरांना आपलं बलिदान द्यावं लागल हे विसरून चालणार नाही. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची गरजच नाही, शिक्षणामुळे ती आपोआप नष्ट होईल असं, म्हणणाऱ्या आत्मकेंद्री वर्गापेक्षा प्रतिगामी शक्तींनीच या चळवळीच महत्त्व अधिक जाणलेलं होत, असं खेदानं म्हणाव लागेल. कारण याच सनातनी शक्तींनी २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यासारख्या शहरामध्ये डॉक्टरांचा निर्घृण खून केला. डॉक्टरांच्या खुनानंतर संघटना कोलमडून पडेल आणि कार्यकर्ते भीतीमुळे हे काम सोडून देतील या भ्रमात राहणाऱ्या सनातनी प्रवृत्तींना संघटनेच्या वाढलेल्या विस्ताराने सणसणीत चपराकच दिलेली आहे.

कायदे झाले म्हणून काही अंधश्रद्धा निश्चितच कमी होतात पण काळाच्या ओघात अंधश्रद्धेचे नवे मार्ग शोधले जातात. त्यामुळेच अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज आजसुद्धा प्रकर्षाने जाणवत असल्याची प्रचीती वारंवार येताना दिसते आहे. सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ येथे पैसे मिळवण्यासाठी वनमोरे बंधूंनी गुप्तधन शोधण्याचा जो अघोरी मार्ग निवडला, तो पाहिला तर आजही मन सुन्न होऊन जाते. शिक्षणातून शहाणपण येतं या उक्तीला छेद देत डॉक्टर आणि शिक्षक अशा उच्चशिक्षित असलेल्या या माणसांनी आपल्या संपूर्ण कुटुंबाला गुप्तधन मिळवण्यासाठी मांत्रिकाच्या नादाला लावत कोट्यवधी रुपयांची फसवणूक करून घेतली. एवढंच नाही, तर पैशाचा तगादा लागल्यानंतर मांत्रिकाने कुटुंबातील सर्व म्हणजे नऊ सदस्यांना विष देवून त्यांचा खून केला. कुटुंबातील एकाही सदस्याला गुप्तधनासाठीच्या कर्मकांडाला विरोध करायचं सुचू नये, हे अनाकलनीय आहे. तंत्रज्ञानाचा प्रचंड मारा असलेल्या आजच्या आत्याधुनिक एकविसाव्या शतकामध्ये गुप्तधन असतं आणि ते मिळवता येतं यावर तथाकथित उच्चशिक्षितांचा विश्वास बसतो ही गोष्ट पुरोगामी महाराष्ट्रात शरमेन मान खाली घालायला लावणारी आहे. ज्या वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या प्रचार आणि प्रसारासाठी डॉक्टरांनी हौतात्म्य पत्करले तो दृष्टिकोन समाजात आजही रुजलेला नाही हे या निमित्ताने प्रकर्षाने जाणवते. अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज काल होती, आज आहे आणि भविष्यातही असणार आहे. जोपर्यंत समाजमन वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवादाचा स्वीकार करत नाही तोपर्यंत फसवणारे आणि फसणारे दोघेही असणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची आणि अशा कामासाठी जीवाची पर्व न करता झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची समाजाला नितांत गरज आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनाची लढाई शतकांची नसून ती अनंत काळाची आहे, हे वास्तव समोर येतं. अंनिसची चळवळ ही लोकांची चळवळ आहे. शोषण नष्ट होऊन समतेवर आधारलेल्या समाजाची निर्मिती हे समितीचं स्वप्न आहे. हे स्वप्न सत्यात उतरायचा असेल, तर या लोकचळवळीत लोकांचा कृतिशील सहभाग अपेक्षित आहे. उद्याच्या काळात तो वाढेल अशी अशा करतो. 'तू लढ मी तुझ्या पाठीशी आहे' असं म्हणणाऱ्यांपेक्षा 'तू लढ मी तुझ्या बरोबर आहे' अशी भूमिका घेणाऱ्यांची समाजाला आणि समितीला आज नितांत अवश्यकता आहे. धन्यवाद! लढेंगे जितेंगे!

**संपादक मंडळ**



# प्रबोधनाच्या कृतिशील चळवळीचे प्रवर्तक : डॉ. दाभोलकर

उत्तम कांबळे
९८८१०९९१४३

सन १९८० च्या नंतरची दशके जागतिकीकरणाचा सांगावा आणणारी आहेत. १९९० नंतर या प्रक्रियेने वेग घेतला. जागतिकीकरणाने समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर परिणाम केले. उद्योगधंद्यांपासून तर सामाजिक व व्यक्तिगत जीवन, कला आणि विज्ञान अशा सर्वच क्षेत्रांत हे परिणाम दिसून येतात. याच काळात काही समाजघटकांचे प्रश्न तीव्र झाले; त्यांच्याही जगण्याची स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत गेलेली दिसते. याच काळात परिवर्तनाच्या लढ्यांनीसुद्धा वेग घेतला. कामगार, महिला, दलित, शेतकरी, शेतमजूर अशा विविध समाजघटकांच्या चळवळींना वेग आला. जातीअंताच्या, समग्र समाजपरिवर्तनाच्या चळवळींनी वेग घेतला. या चळवळींना प्रतिक्रिया म्हणून या लढ्यांचे विरोधक व शत्रूदेखील सक्रिय झालेले दिसतात.

जागतिकीकरणामुळे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढू लागली. 'आहे रे' वर्ग हा आपली सुबत्ता टिकविण्यासाठी तर 'नाही रे' वर्ग जगण्याच्या विवंचनेवरील उपाय म्हणून देवधर्म आणि अध्यात्माच्या छत्राखाली जगण्याचा कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणावर खोटा आधार शोधू लागला. अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर फोफवायला लागल्या. या दोन दशकांचा पृथक पृथक विचार केला तर असे लक्षात येते की, अनेक बुवा-बाबा, तांत्रिक-मांत्रिक ही ऐंशीच्याच दशकाची देण आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून चालत आलेल्या गाडगे महाराज, तुकडोजी महाराज, इत्यादींनी चालवलेल्या प्रबोधनाच्या चळवळी, 'सत्यशोधक' सारख्या परिवर्तनाच्या चळवळी सत्तरच्या दशकापर्यंत थंडावल्या होत्या. देवधर्म, अध्यात्म यांच्या बाजूने अंधश्रद्धा जशा आल्या तसे त्यांना प्रश्न विचारणाऱ्या चळवळींनासुद्धा धुमारे फुटले. १९८० च्या दशकातच देवदासीमुक्ती आंदोलन सुरू झाले. अंधश्रद्धांच्या विरोधातील लढाई विज्ञानविषयक प्रबोधनाच्या स्वरूपात प्रतीकात्मक राहिली होती. त्यास बुवाबाजीविरुद्धच्या लढाईचे स्वरूप नंतर प्राप्त झाले. मात्र हा लढा भारतभर काही प्रदेशात विखुरलेल्या स्वरूपात होता. ठोस भूमिका घेऊन या लढ्याला संघटनेचा आकार देऊन चळवळीमध्ये रूपांतर करणाऱ्या एखाद्या व्यक्तीची गरज होती. ही पोकळी भरून काढणारी व्यक्ती म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर. डॉ. दाभोलकरांनी प्रबोधनाच्या व सामाजिक परिवर्तनाच्या नव्या संकल्पना घेऊन 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' या संघटनेच्या स्थापनेतून या चळवळीला आकार दिला.

जनसमूहापर्यंत पोहोचण्यासाठी कोणत्याही चळवळीचे सार्वत्रिकीकरण होणे हा एक महत्त्वाचा टप्पा असतो. यासाठी दाभोलकरांनी प्रयत्नपूर्वक या चळवळीत तरुणांसह ज्येष्ठ नागरिक, महिला, प्राध्यापक, वकील, अभिनेते, उद्योगपती, विविध क्षेत्रातील उच्चशिक्षित व शासन सेवेतील अधिकारी यांना आकृष्ट केले. देवधर्म, अध्यात्म व यातील अनाकलनीय चमत्कार यांना प्रश्न न विचारण्याने अंधश्रद्धा वाढीस लागतात. प्रबोधनाचा परिणाम असा होतो की, श्रद्धेच्या प्रांतातही माणूस प्रश्न विचारायला लागतो. ही प्रश्न विचारण्याची आस डॉ. दाभोलकरांनी समाजमानसात निर्माण केली. वैज्ञानिक दृष्टिकोनाबरोबर तरुणांना भावतील असे संविधानजागर, क्रांतिकारी संतपरंपरा, विवेक अर्थात तर्कशुद्ध विचारसरणी असे मापदंड चळवळीला जोडले. सर्वांच्या प्रबोधनासाठी पहिला मापदंड वैज्ञानिक दृष्टिकोन हा, तर दुसरा मापदंड धर्म आणि धर्मातील क्रांतिकारी संतपरंपरा घेतला. धर्माच्या क्षेत्रात बुद्धापासून तर कबीर, तुकाराम, गाडगे महाराज, तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत सर्वांनी धर्माच्या अंगानेच वाढत जाणाऱ्या अंधश्रद्धांपासून नेहमीच जनतेला सावध केले आहे. त्यासाठी सॉक्रेटिस, मार्क्स, विवेकानंद अशा पुरोगामी विचारवंतांच्या विचारांचीदेखील जोड दिली. त्यांनी स्पष्ट केले की, आपला लढा देवाधर्माशी नसून देवाधर्माच्या अंगाने

फोफावणाऱ्या अंधश्रद्धांशी व त्यातून होणाऱ्या शोषणाच्या विरोधात आहे. अंधश्रद्धांशी लढण्यासाठी असे हे एक वैशिष्ट्यपूर्ण प्रारूप (मॉडेल) त्यांनी तयार केले. या प्रारूपामुळे आस्तिक विरुद्ध नास्तिक असा वाद निर्माण न होता दोन्हींच्या मध्याशी असणाऱ्या विवेकावर, तर्कशुद्धतेच्या पायावर चळवळ उभी राहिली. त्यामुळे केवळ बुवाबाजीच्याच विरोधापुरती नाही, तर जीवनमूल्यांशी संबंध जोडणारी, जीवन समग्रतेने प्रकाशमान करणारी, नवा माणूस घडवणारी चळवळ उभी राहिली.

अंधश्रद्धांना जन्म देणारी एक व्यवस्था संपूर्ण जगात अस्तित्वात आहे तशी ती भारतातदेखील आहे. या व्यवस्थेला पोसणारी रसद जेव्हा तोडली जाईल तेव्हाच अंधश्रद्धेची व्यवस्था कोलमडून पडेल. यासाठी समाजाचे जसे पाठबळ आवश्यक आहे तसे कायद्याचेदेखील पाठबळ महत्त्वाचे ठरते. म्हणून दाभोलकरांनी विविध पद्धतींनी, विविध मार्गांनी प्रयत्न केले. कायद्यांची निकड लोकांना समजावून दिली तशीच लोकप्रतिनिधींनादेखील समजावून दिली.

सुरुवातीला देवदासी प्रथेविरोधातल्या लढ्यात दाभोलकरांचा सहभाग होता. देवदासी प्रथेविरोधात कायदा झाल्याने त्या लढ्याची परिणामकारकता वाढली हा त्यांचा पूर्वानुभव होताच. यापूर्वी अंधश्रद्धांच्या आधारे झालेल्या अन्याय, अत्याचार, फसवणूक, शोषणाच्या गुन्ह्यांसाठी स्वतंत्र असे कायदे अस्तित्वात नव्हते. त्यामुळे पूर्वीच्या कायद्यानुसार गुन्हे करणाऱ्यांना जरी शिक्षा होत असली तरी गुन्ह्यांचे सूत्रधार असलेले भोंदूबुवा-बाबा मात्र कायद्याच्या कक्षेत सापडत नव्हते. ते सूत्रधार दाभोलकर यांच्या हौतात्म्यानंतर पारित झालेल्या जादूटोणा प्रतिबंधक कायद्यामुळे शिक्षेच्या कचाट्यात आले.

दाभोलकरांनी तरुणांची शक्ती सृजनात्मक गोष्टींसाठी वापरून तरुणांची अशी पिढी घडविली जी स्वतःला विवेकवादी म्हणवण्यात अभिमान बाळगणारी आणि समाजातील अंधपरंपरांना ठाम विरोध करते असे सांगणारी आहे. मात्र ही पिढी घडवून तिचा वारसा चालू ठेवण्यासाठी सातत्याने नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची आवश्यकता असते; ज्यामुळे नव्या जोमाच्या तरुणाईचा ओघ संघटनेत सतत येत राहतो. असे विविधांगी उपक्रम, कार्यक्रम त्यांनी संघटनेमध्ये अंतर्भूत केले; ज्यामुळे संघटना कधीही निष्क्रिय झाली नाही.

डॉ. दाभोलकर कार्यकर्ता कसे घडवायचे, विचार व आचारांचा प्रचार कसा करायचे, कार्यकर्त्यांमध्ये समर्पणाची व त्यागाची भावना कशी निर्माण करायचे याबाबत पृथक असा विचार केल्यास त्यांच्या संघटनात्मक कौशल्याचे महत्त्व लक्षात येते. या चळवळीला जसा प्रबोधनाचा आयाम आहे तसाच कृतिशील समाजपरिवर्तनाचादेखील आहे. या चळवळीमध्ये प्रबोधनाच्या आणि कृतिशीलतेच्या परंपरागत संकल्पनांना परिवर्तित, विकसित आणि विस्तारित स्वरूप देत दाभोलकरांनी त्या अंमलात आणल्या आहेत. यासाठी त्यांनी समाजातील सर्वच वर्गातून सहभाग अथवा पाठबळ मिळवले आहे. त्यात शिक्षित, अशिक्षित, उच्चविद्याविभूषित, उच्चपदस्थ, अगदी उद्योगपती, शास्त्रज्ञ, कला व साहित्य क्षेत्रातील मान्यवर अशा सर्व घटकांना समाविष्ट करून घेत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला बळकट केले. त्यामुळेच अंधश्रद्धा निर्मूलन संघटनेची समाजात विश्वासार्हता निर्माण झाली.

या चळवळीतील कार्यकर्त्यांना कोणताही व्यक्तिगत लाभ मिळत नाही, राजकीय लाभ मिळत नाही; कित्येकदा मिळतो तो समाजाचा रोषच. तरीही त्यांनी समाजपरिवर्तनाची आस असणाऱ्या निःस्वार्थी तरुण कार्यकर्त्यांची फळी उभी केली. त्यांनी घडवलेल्या या तरुणाईमध्येच विवेकशील समाजनिर्मितीची बीजे रोवली गेली आहेत. अशी ही समग्र परिवर्तनाची चळवळ दाभोलकरांनी महाराष्ट्राला दिलेली एक देणगी आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात तिच्या ३३ वर्षांच्या यशस्वी वाटचालीची दखल अनेक पातळ्यांवर घेतली गेली आहे आणि चळवळीची ही वाटचाल भारतातीलच नव्हे, तर जगभरातील विवेकवादी चळवळींना प्रेरणादायी; तसेच मार्गदर्शकदेखील ठरली आहे.

समाजाच्या गरजा लक्षात घेऊन दाभोलकरांनी वेळोवेळी विविध कालसुसंगत उपक्रम समाविष्ट करून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या निमित्ताने सुरू झालेल्या या चळवळीचे मूल्यवर्धन केले; त्यामुळे ही चळवळ ताजीतवानी राहून सतत वर्धिष्णू राहिली. जागतिकीकरणाच्या रेट्याने जीवनशैली बदलते आहे; त्यातून निर्माण होणाऱ्या ताणतणावांमुळे मानसिक

आजारांचे प्रमाण वाढले आहे. त्या अनुषंगाने मानसिक आरोग्याचे महत्त्व ओळखून दाभोलकरांनी मानसोपचार, समुपदेशन या बाबींचा समावेश संघटनेच्या उपक्रमांमध्ये केला. याचप्रकारे पुढील काळातही समाजाच्या गरजा लक्षात घेऊन योग्य उपक्रमांनी चळवळीचे मूल्यवर्धन होत राहिले तरच समाज तिला आपलीशी करेल. जातपंचायत मूठमाती अभियानाच्या परिणामस्वरूप पारित झालेला सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा, जोडीदाराची विवेकी निवड, मिश्र विवाह अशा उपक्रमांच्या टप्प्यातून ही चळवळ निश्चितच जातीअंताकडे प्रवास करते आहे, असे म्हणता येईल. नावीन्यपूर्ण उपक्रम संघटनेच्या कार्यात जोडून दाभोलकरांनी संघटना सतत प्रवाही ठेवली; त्यामुळे कार्यात साचलेपण आले नाही. यापुढील काळातही ते येणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. संघटनेचा बुवाबाजीविरोधाने सुरू झालेला हा प्रवास समाजाला लोकशाहीतील एक जबाबदार, विवेकी व सुजाण नागरिक घडविण्यापर्यंत आलेला आहे.

चळवळीचा एवढा आशादायक प्रवास असला तरीही आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानस्नेही समाजातही कधी नव्हे एवढी अंधश्रद्धा निर्मूलनाची निकड भासू लागली आहे; हा विरोधाभास दिवसेंदिवस ठळक होताना दिसतो आहे. जागतिकीकरणाच्या चक्रातून जाणारा हा समाज असुरक्षिततेच्या भावनेतून बुवाबाजीकडे वळतो आहे. गेल्या काही वर्षांत तुरुंगातील व तुरुंगाबाहेरील अनेक मोठे तथाकथित प्रतिष्ठित बुबा-बाबा, आध्यात्मिक गुरू यांचे वाढते प्रस्थ हे त्याचेच निदर्शक आहे. दाभोलकरांनी निर्माण केलेले चळवळीचे हे प्रारूप बदलत्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीमध्ये टिकवून ठेवण्याबरोबरच यापुढेही कार्यप्रवण राहून विकसित कसे होत राहील, त्याची विश्वासार्हता कशी वाढत जाईल हे संघटनेसमोरील खरे आव्हान ठरणार आहे. संघटनेत तरुणांचा सहभाग वाढला तर संघटनेचे आयुर्मान वाढेल व ही चळवळ दीर्घ पल्ल्याची लढाई लढू शकेल.

डॉ. दाभोलकरांनी वैचारिक विरोधकांशीसुद्धा प्रासंगिक संवाद साधला आणि त्यातून विरोधकांचा केवळ विरोधच कमी झाला नाही तर अशा संवादानंतर अनेक विरोधकसुद्धा या चळवळीत सहभागी झाले; हेच त्यांचे संवादकौशल्य होते. या संघटनेने आतापर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांचे दस्तावेजीकरण होऊन त्यांचे मूल्यमापन, त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. दाभोलकरांसारख्या विशाल, बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे कार्य एका लेखात मांडणे तसे अवघड आहे. परंतु तरीही त्यांच्या स्मृतिनिमित्ताने एक डॉक्टर, लेखक, प्रबोधनकर्ता, संघटक, मार्गदर्शक अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध रूपांचे स्मरण नक्कीच प्रेरणादायी ठरते.

(लेखक महाराष्ट्र अंनिसचे राज्य उपाध्यक्ष आहेत)


शब्दांकन : राजेंद्र फेगडे, प्रल्हाद मिस्त्री

●

**वार्ता अंधश्रद्धेच्या : सरळ वास्तूफेम चंद्रशेखर गुरुजींची हत्या**



सरळ वास्तु फेम चंद्रशेखर अंगडी उर्फ चंद्रशेखर गुरुजी यांची दि. ५ जुलै २०२२ रोजी कर्नाटकातील हुबळी येथे हत्या करण्यात आली. मंजुनाथ मारवाड आणि महांतेश शिरूर या आरोपींना हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेली आहे. यापैकी महांतेश शिरूर हा चंद्रशेखर यांचा व्यवसाय पाहात होता. बेनामी मालमत्ता विकून पाच कोटी रुपये मिळवल्याचे कारण या हत्येमागे असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केलेला आहे. एखाद्याची हत्या करणं हे निषेधार्हच असून त्याचं समर्थन होऊच शकत नाही. पण दुसऱ्याच्या आयुष्यातील सुखदुःखाच्या प्रसंगाचे धागेदोरे वास्तूपर्यंत जोडणाऱ्यांना आपल्या आयुष्यातील अत्यंत धोकादायक क्षणाची यत्किंचितही पूर्वकल्पना येऊ नये, याचं आश्चर्य वाटतं. वास्तूज्योतिषांच्या माध्यमातून वास्तूमध्ये फेरफार करणाऱ्यांनी या घटनेपासून बोध घ्यावा. एवढेच नाही, तर आपल्याला सल्ला देणाऱ्यांची संपत्ती आणि त्यांचं ऐय्याशी जीवन सर्वसामान्यांच्या आर्थिक, मानसिक आणि शारीरिक फसवणुकीत आहे हे लक्षात घ्यावं.



# प्रिय डॉक्टर...

राजाभाऊ शिरगुप्पे
९४२३२८७३२०

प्रिय डॉक्टर, मला माहिती आहे, मी तुम्हांला हे व्यक्तिगत पत्र लिहीत आहे. तुम्ही भौतिकदृष्ट्या देहरूपाने या विश्वात अस्तित्वात नाही. बुद्धाच्या भूमिकेनुसार मनुष्य देहरूपाने नष्ट होतो. पण इतरांच्या रूपाने तो विचाररूपाने अस्तित्वात राहातो, अमर्त्य राहातो. तुम्ही उभ्या केलेल्या 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' या संघटनेच्या विवेकवादी असंख्य कार्यकर्त्यांच्या रूपाने तुम्ही चिरंजीव आहात. म्हणून तुमच्याशी मी हा संवाद करू पाहातोय.

तुम्ही संघटना निर्माण करताना मी अगदी कुमारवयातील विद्यार्थी होतो आणि काहीतरी वेगळे करू पाहाणाऱ्या युयुत्सू वृत्तीने तुमच्या कार्याकडे आकर्षित झालो होतो. हातचलाखी आणि वैज्ञानिक क्लृप्त्या वापरून चमत्कारांचा आभास निर्माण करून, सामान्य नाकासमोर चालणाऱ्या आणि त्यामुळे अंधविश्वासू झालेल्या अज्ञजनांना लुबाडणाऱ्या, धार्मिकतेचा आव आणणाऱ्या भोंदू-बुवा-बायांचा पर्दाफाश करताना काही क्रांतिकारक काम करतो आहे, असे वाटायचे. पण मग राज्यशास्त्रावरची पुस्तके वाचत गेलो. राज्यव्यवस्थेचे जगद्व्याळस्वरूप कुवतीनुसार समजून घेण्याचा प्रयत्न करू लागलो. तसतसे जादूचे प्रयोग करणारे हे भगव्या कपड्यातले भामटे चिल्लर वाटू लागले. थेट व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी तरुण रक्त उसळू लागले. तुमचे जादूचे प्रयोग उघड करणारी चळवळ थिटी वाटू लागली. व्यवस्था बदलण्यासाठी अधिक क्रांतिकारक हत्याराची गरज वाटू लागली. इतकी की थेट नक्षलवादी चळवळीचे आकर्षण वाटू लागले. तुमच्या चळवळीपासून दूर गेलो आणि अधिकाधिक क्रांतिकारक चळवळ शोधण्यात आयुष्याची दहा वर्षे घालवली. तोवर तुमच्या चळवळीने प्राथमिक कक्षा ओलांडून क्रांतिकारक क्षितिजाकडे झेप घेतली होती. ती इतकी की, भारतीय समाजाला ग्रासून राहिलेल्या जातव्यवस्था आणि बौद्धिक गुलामगिरीला सुरूंग लावणाऱ्या विवेकवादी भूमिकेला अग्रभागी आणण्याइतकी तुमची अंनिस संघटना शक्तिशाली झाली होती. प्रस्थापित राज्यव्यवस्थेला आव्हान बनली होती आणि लक्षात आले, किरकोळ भोंदू-बाबांना उघडे पाडताना तुम्ही भविष्यातील समग्र क्रांतीचा कसा वेध घेत होता. मी पुन्हा तुमच्या चळवळीच्या व्यापक दर्शनाने भानावर आलो. तुमच्याकडे आकर्षित झालो. तुमच्या संघटनेमार्फत कृतिशीलही झालो. तुम्हीही तुमच्या अढी न धरणाऱ्या मूळ स्वभावाप्रमाणे मला जवळ घेतले. प्रेमाने खांद्यावर हात ठेवलात आणि चळवळीचा साथी केले. शत्रूला आपला नेमका शत्रू कोण हे नेमकेपणाने कळते. जसे, बाराव्या शतकात आपल्या तत्त्वज्ञानाच्या समूळ विरोधात असलेल्या त्यावेळच्या ब्राह्मण प्रस्थापितांना ब्राह्मण जातीतच जन्माला आलेले महात्मा बसवण्णा जास्त धोकादायक वाटले आणि त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांनाच नष्ट करायचा प्रयत्न केला किंवा स्वतंत्र भारतात परधर्मीय आपले शत्रू आहेत असा इतिहास सांगणारे स्वधर्मीय असणाऱ्या महात्मा गांधीचे हत्यारे झाले. याचाच अर्थ असा की, केवळ भौतिक शत्रु पेक्षा विचार शत्रू प्रस्थापितांना जास्त धोकादायक वाटतो आणि हेच सत्य सद्य काळात तुमच्यापासून गौरी लंकेशपर्यंतच्या हत्येने अधोरेखित केले.

मनुष्य हा विचार करणारा प्राणी आहे. म्हणून त्याच्या विचारप्रक्रियेला एक तर बधीर करणे, आपल्या नियंत्रणाखाली ठेवणे, यासाठी राज्यकर्त्यांचा आटोकाट प्रयत्न चाललेला असतो. कारण केवळ शस्त्राने आणि साखळदंडांनी मनुष्याला आपल्याला अंकित करता येत नाही. हे मानवाच्या आजवरच्या इतिहासात अनेकवेळा आणि पुन्हा-पुन्हा सिद्ध झाले आहे. त्यामुळेच भविष्याबद्दलचे भय देव आणि धर्म या दोन गोष्टींच्या साहाय्याने बहुसंख्य मानवी मनात निर्माण करता येते व त्यायोगे वरकरणी गुलाम न दाखवता गुलामापेक्षाही हीन-दीन अवस्थेला पोहचवता येते. हे आजवरच्या देव आणि धर्म या दोहोंच्या वापरातून वारंवार दृष्टोत्पत्तीस आले आहे. त्यामुळे मानवमुक्तीचा खरा संघर्ष केवळ

**(पान नं. १७ वर पहा)**



# डॉ. नरेंद्र दाभोलकर : एक निरंतर तेवणारी ज्योत

सुशीला मुंडे
९८७०७३०३६८

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अन्य राज्यांतदेखील आज उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही या भावनेने अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करणारे हजारो युवा-युवती सक्रिय आहेत. कारण विचारांचा लढा हा विचारांनीच लढला पाहिजे, हे तत्त्व त्यांना समजलेले आहे. हे समजावून देण्यात डॉ. नरेंद्र दाभोलकर यशस्वी झालेले होते. एखाद्या मातब्बर चळवळीचे नेतृत्व करणारा कुशल संघटक कसा असावा याचे सूक्ष्म अवलोकन केले तर डॉक्टरांचे बरेच पैलू समोर येतात. जे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरतात. तसं पाहिलं तर अंधश्रद्धा निर्मूलन हा अतिशय संवेदनशील विषय. आजच्या घडीला चळवळीचे बहुआयामी काम पाहिले, तर अंधश्रद्धा निर्मूलन किती स्तरावर करता येते आणि ते किती गरजेचे आहे हे सहज उमगते. मुळात अंधश्रद्धा निर्मूलन हा काही चळवळीचा विषय होऊ शकतो का? यावरून डॉक्टरांची खिल्ली उडवणारे आज म्हणतात खरंच, 'हात लावीन तिथे सोने करणारा तू होतास!'

डॉक्टर आणि त्यांचे असंख्य कार्यकर्ते यांनी चालवलेला हा चळवळीचा प्रवास नक्कीच तिमिरभेद करणारा आहे. महाराष्ट्राची परंपरा, संत व समाजसुधारकांचा वारसा, महाराष्ट्राचे पुरोगामित्व या चळवळीने अधिक लखलखीत केले आहे. कुठल्याही मतांबद्दल, सुधारणाबद्दल टोकाचे आग्रही न राहाता जनतेत जाऊन, जनतेला सामावून घेऊन डॉक्टरांनी ही चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवली. आज महाराष्ट्रात, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३५० हून अधिक शाखा आहेत. ज्यामध्ये रिक्षावाला, भाजीवाला ते अगदी नामांकित वकील, डॉक्टरपासून सर्व स्तरातील सक्रिय कार्यकर्ते समर्पित भावनेने काम करत आहेत. कुठल्याही भौतिक सुविधा न देणाऱ्या चळवळीत हे घडत आहे. याचे कारण डॉक्टरांकडे असलेली सर्जनशीलता. या सर्जनशील विचारांमधून त्यांनी चळवळीला अतिशय नावीन्यपूर्ण उपक्रम दिले की, जे शासनालादेखील मान्य करावे लागले. पर्यावरणपूरक होळी, पर्यावरणपूरक दिवाळी, संविधान महोत्सव आदी त्यापैकीच काही आहेत.

'जग बदल घालुनी घाव' हे तत्त्व त्यांना पटलेले असावे. कार्यकर्ता हेरणे हे डॉक्टरांना अगदी सहज जमायचे. हेरलेला कार्यकर्ता त्यांच्या तावडीतून मग सुटायचा नाही. कार्यक्रम आणि मीटिंगमधून हेरलेल्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावर हात ठेवून, त्याला थोडंसं बोलत-बोलत बाजूला घेऊन जाणे, चळवळीचे महत्त्व पटवून त्याच्यामध्ये काय पोटेन्शिअल आहे ते त्याला पटवून देणं, त्याच्या कुटुंबियांची आस्थेवाईकपणे चौकशी करणं आणि मग विश्वास बसला की, अलगद त्याच्यावर चळवळीचं एखादं छोटं-मोठं काम सोपवून त्याचा पाठपुरावा करणे. तुला काही अडचण आहे का? असे वडीलकीच्या नात्याने विचारत डॉक्टरांनी अख्ख्या महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी चळवळीची ऊर्जाकेंद्रे निर्माण केली. दुसऱ्या बाजूला एखादा कार्यकर्ता चळवळीमध्ये अडचण निर्माण करत असेल, चळवळीच्या ध्येय-धोरणाशी विसंगत वर्तन करत असेल, चळवळीची शिस्त मोडत असेल तर तो चळवळीच्या बाहेर कधी पडला असेल हे जवळच्या वर्तुळातदेखील कळत नसे. 'तेरी भी चूप, मेरी भी चुप', या सर्व गोष्टींचा कुठे बोभाटा होत नसे. अर्थात, चळवळीच्या हितासाठी या गोष्टी कराव्याच लागतात आणि डॉक्टर त्या करतही होते. निष्ठेने, चारित्र्य स्वच्छ ठेवून, लोकांचा विश्वास संपादन करून, अहिंसेचे तत्त्व अंगीकारून व अत्यंत काटकसरीने पंचवीस वर्षे त्यांनी चळवळीच्या कामाचा आलेख सतत उंचावत नेला. हे करताना त्यांना महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा, कलावंतांचा, विचारवंतांचा, साहित्यिकांचा आदर आणि सहकार्य पुरेपूर मिळत होते. आणखीन एक जमेची बाजू म्हणजे 'बोले तैसा चाले' हे व्रत डॉक्टरांनी आणि चळवळीतील कार्यकर्त्यांनी स्वीकारलेले होते. जाती-धर्मभेदाच्या पलीकडे गेलेले असंख्य कार्यकर्ते आज या चळवळीत सक्रिय आहेत.

या चळवळीने महाराष्ट्राला एक छानसा संदेशही दिला. 'ख्रिस्त महम्मद मांग ब्राह्मणांशी धरावे पोटाशी बंधू परी.' सारे धर्म एकसमान असल्याची संकल्पना त्यांनी मांडली. देव एक, धर्म का अनेक? ज्योती म्हणे. असा विचारांचा वारसा डॉक्टरांनी महाराष्ट्राला दिला. विचारांच्या पातळीवर धर्म असो, अथवा देव असो किंवा रूढी, परंपरा, कर्मकांड असोत डॉ.दाभोलकर यांनी कधीही बोटचेपी भूमिका घेतलेली नाही. आपलं नाणं खणखणीतपणे ते शेवटपर्यंत वाजवतच राहिले. विरोधकांकडून वारंवार होणाऱ्या हल्ल्याचा त्यांनी कधीही बाऊ केला नाही. त्यामुळे 'विवेकाचा जागर करणारा यज्ञ थंडावला' असे कार्यकर्ते कधीच म्हणणार नाहीत. उलट विवेकाची ज्वाला अधिकच जोमाने तेजोमय होत असल्याचा प्रत्यय आपण सगळे अनुभवत आहोत. सामाजिक प्रश्न सहज सुटणार असेल तर संघर्षाचा पवित्रा सोडून देणं, कोणताही प्रश्न तुटेपर्यंत न ताणणे, प्रश्न सोडवताना शिस्त, सुनियोजन, वक्तशीरपणा आणि सनदशीर मार्गाचा अवलंबही रणनीती डॉक्टरांनी अवलंबिली आणि त्यामुळेच त्यांच्या कार्यपद्धतीला त्यांच्या विश्वासार्हतेला, नेतृत्वाला आक्षेप घेण्याचे धाडस कोणीही केले नाही. जे आक्षेप घेतले गेले ते अत्यंत हास्यास्पद, गैरसमजावर आधारित आणि पूर्वग्रहदूषित होते.

डॉक्टर नेहमी म्हणत असत, ''तुम्ही काम करा, तुम्हाला पैसा कधीच कमी पडणार नाही.'' त्यांच्या या वाक्याचा प्रत्यय आम्हाला त्यांच्या खुनानंतर दरवर्षी येत होता. विशेष म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका २०२१ च्या वार्षिकांकावेळी कोविडसारखी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना ही बाब प्रकर्षाने जाणवली. 'सदैव सैनिका पुढेच जायचे' या उक्तीप्रमाणे कार्यकर्ते अक्षरशः झपाटल्यागत कामाला लागले आणि जाहिरात/ देणगीद्वारे संघटनेसाठी कार्यकर्त्यांनी तब्बल ४९ लाख रुपये जमा केले. शहादा, नंदुरबार, पुणे, चंद्रपूर, लातूर येथील कार्यकर्त्यांनी तर कमालच केली. कधी कधी खरंच प्रश्न पडतो, हे हत्तीचं बळ कार्यकर्त्यांमध्ये येतं कुठून?

संघटनेवरील निष्ठा, काम करण्याची ऊर्मी, प्रामाणिकपणा, उद्दिष्टपूर्तीसाठी झपाटलेपण या सर्व गोष्टी कार्यकर्त्यांमध्ये समरसून भरलेल्या आहेत. अशा चळवळी, 'लढवय्या हरपला' म्हणून कधीच थांबत नसतात किंवा आमचा पैसा गेला, आमची साधने गेली, आमचे वार्तापत्र गेले म्हणून शोक करत, हातावर हात ठेवून बसत नाहीत, तर मैदानात उतरून अधिक वेगात कृतिशील होतात. याचा प्रत्यय महाराष्ट्रातील जनतेला आलेलाच आहे.

डॉक्टर म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ असे समीकरण तितकेसे बरोबर वाटत नाही. कारण त्यांचे काम फक्त अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीपुरतेच सीमित नव्हते. राष्ट्र सेवा दल असो, महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आर्थिक आधार देणारा सामाजिक कृतज्ञता निधी असो, साताऱ्यातील रयत शिक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था असोत, परिवर्तन हे व्यसनमुक्ती केंद्र असो की त्यांनी यशस्वीपणे संपादक म्हणून सांभाळलेली साधना साप्ताहिकाची धुरा असो, जोडीदाराची विवेकी निवड हा युवक-युवतींना हवाहवासा वाटणारा प्रकल्प असो व जाता जाता जातपंचायतीसारख्या संवेदनशील प्रश्नांना हात घालणं असो, डॉ. नरेंद्र दाभोलकर हे नाव त्यांच्या इतिहासात सापडत राहीलच. कारण समाजातील सर्वच समग्र प्रश्नांशी अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ सातत्याने स्वतःला जोडून घेत आहे. अशा या निर्मोही, निर्भीड, नेमस्त कार्यकर्त्याची विरोधकांना का बरं भीती वाटत होती?

डॉक्टरांची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नाही, तर सुधारणावादी समाजात समतेची कास धरणाऱ्या, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह धरणाऱ्या, एकमेकांना सन्मानाने वागवणाऱ्या मानवतेची हत्या आहे. त्यामुळे दाभोलकर कुटुंबाची अपार हानी तर झालीच; परंतु त्याहून जास्त हानी समाजजीवनाची झालेली आहे. विवेकाधिष्ठित समाजनिर्मितीचे स्वप्न पाहणारे डॉक्टर आज शरीराने आपल्यामध्ये नसले, तरी विचाराने असंख्य कार्यकर्त्यांमध्ये सामावलेले आहेत. त्यांच्या स्मृती, कार्य, उद्गार, त्यांनी लिहिलेली पुस्तके, त्यांच्या आवाजातली भाषणे, टी.व्ही.वर झालेले कार्यक्रम, खुनानंतर पारित झालेले दोन महत्त्वाचे कायदे, त्यामुळे आश्वस्त झालेला समाज हे सगळंच अवघ्या महाराष्ट्राला प्रेरणादायी आहे. विवेकाचा आवाज बुलंद करण्यासाठी अवघा महाराष्ट्र कटिबद्ध आहे. पुरोगामी महाराष्ट्रात या लाडक्या सुपुत्राचा अशाप्रकारे अंत होणे ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे.

डॉक्टर तुम्हाला विनम्र अभिवादन!

(लेखिका महा. अंनिसच्या निमंत्रित राज्य कार्यकारिणी सदस्या आहेत.)



# माझी विवेकप्रेरणा : डॉ. नरेंद्र दाभोलकर

डॉ. शशांक कुलकर्णी
८९९९७९२१८९

मी एक सर्वसामान्य आयुष्य जगलेला किंवा जगत असणारा माणूस आहे, असं मी नम्रपणे आणि खरोखर मानतो. जेव्हा मी अनेकांची भव्य आणि दुसऱ्यांना प्रेरित करणारी आयुष्ये पाहतो तेव्हा तर माझा हा समज घट्ट होतो. या लेखाच्या निमित्ताने मला माझ्या आयुष्याकडे मागे वळून बघण्याची संधी मिळाली असं मी समजतो, त्याबद्दल मी संपादकांचे आभार मानतो.

माझ्यावर ज्यांच्या आयुष्याचा प्रभाव पडला आहे किंवा ज्यांच्याकडून प्रेरणा मिळत गेली त्यांच्याकडे मी तीन दृष्टिकोनातून पाहतो. एक, त्या व्यक्तीचे बाह्य व्यक्तिमत्त्व. दोन, त्याचे आचार-विचार आणि तीन, त्यांचा आपल्या जीवनावर पडलेला प्रभाव आणि अंमलबजावणी. बाह्य व्यक्तिमत्त्वाचा आपल्यावर खूप प्रभाव पडत असतो. निदान आपल्या संस्कारक्षम वयात तरी नक्कीच! ती व्यक्ती बोलते कशी, चालते कशी, तिची वेशभूषा, तिचं दिसणं, समोरच्यावर छाप पाडण्याची क्षमता यांचा परिणाम आपल्या मनावर खूप पडत असतो असं मी तरी मानतो. मग आपण त्या व्यक्तीच्या जेव्हा थोडे जवळ येतो, आपला संपर्क वाढतो तेव्हा तिच्या विचारांशी आपली ओळख होते. त्या व्यक्तीच्या विचारांना तिच्या आचारांशी आपण नकळतच ताडून पाहतो. जसजसं त्यांच्या आचार आणि विचारांमध्ये फार फरक नाही असं आपल्याला समजत जातं, तसतसा त्या व्यक्तीबद्दलचा आदर वाढतो आणि ते विचार आपल्या आयुष्यातही काही सकारात्मक फरक घडवून आणतील का? असं वाटतं.

माझ्या आयुष्याचे वैचारिक पालकत्व मी ज्यांना अर्पण करू इच्छितो, ज्यांनी माझ्या आयुष्यातील वैचारिक अंधकार नाहीसा केला आणि विवेकाची झोळी मला सुपूर्द केली ते माझे फिलॉसॉफर, गाईड आणि मेंटॉर म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर.

१९८९ मध्ये मी सातारा येथे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये इंटर्नशिप करत होतो. तोपर्यंत मी 'गर्व से कहो ......' वगैरे होतो. मी शाखेत अधूनमधून जात होतो. हृदयसम्राटांच्या भाषणांनी मंत्रमुग्ध व्हायचो. मला सामाजिक कामांची आवड होती म्हणून विद्यार्थी संघटनेमध्येही जात होतो. शिबिरांना हजेरी लावत होतो. पण मला काम करत असताना काही प्रश्न पडत होते. त्यांची उत्तरे मिळत नव्हती किंवा टाळली जात होती. त्या वयात ती अस्वस्थता सहन व्हायची नाही. अशा अवस्थेत एकदा अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या आंदोलनात सहभागी होण्याची संधी मिळाली.

साताराजवळील एका डोंगरावरील गावात वर्षातील एका अमावास्येला भूते येतात म्हणून अख्खं गाव डोंगरावरून खाली येण्याची प्रथा होती. साधारण शंभरेक उंबरा असलेले गाव डोंगरावरून केवळ दोन दिवसांसाठी खाली आणणे याची केवळ कल्पनाच केलेली बरी. आम्हाला त्याच अमावास्येला डोंगरावर जाऊन तिथल्या देवळात किंवा धर्मशाळेत राहायचे होते. डॉक्टरांचे एक व्याख्यान होते आणि विवेकवादाची काही गाणी वगैरे. त्या गावातील काही तरुण आमच्याबरोबर राहायला तयार झाले. त्या निमित्ताने त्यांचं प्रबोधन करता आलं. मला खरं तर छोट्या ट्रेकिंगचं आकर्षण वाटलं नि नवीन उपक्रम म्हणून गेलो आणि एखादा छोटा प्रसंगसुद्धा माणसाचं आयुष्य कसं बदलून टाकतो याचा आश्चर्यजनक अनुभव मला आला.

त्यांच्या व्याख्यानानंतर सर्वजण अवाक् झाले होते. एखाद्या माणसाचे विचार किती स्पष्ट असू शकतात, याची प्रचिती आली. मला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे इथेच मिळतील याची खात्री पटली. मी एक छोटासा कार्यकर्ता झालो. त्याच वर्षी 'महाराष्ट्र अंनिस' ची स्थापना झाली. माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते या कामाकडे ओढले गेले. त्यांनी कार्यकर्त्यांना अभ्यास करायला लावला. त्या अभ्यासात जसे काँग्रेस, गांधीजी, नेहरू, सरदार होते तशी समाजवादी चळवळ होती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होता; नंतर बीजेपी, इतिहास, फाळणी अशा राजकीय विषयांचा

तर अंतर्भाव होताच; पण हिंदू-मुस्लीम प्रश्नही होता, त्याची कारणं होती, बहुजन चळवळी होत्या. मुख्य म्हणजे भारतीय समाज मागे पडण्यासाठी अंधश्रद्धा कशा कारणीभूत आहेत, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा कसा अभाव आहे यावर त्यांचा भर होता. त्यासाठी राजकीय पक्षांपासून समान अंतर राखलं पाहिजे, हेही ते आमच्यावर ठसवत होते. त्यामुळेच अंनिसमध्ये सर्व राजकीय पक्षांच्या विचारांचे कार्यकर्ते आहेत. म्हणूनच हे कार्य निरंतर चालू राहील. लोकशाहीमध्ये मतभेद तर असणारच. पण म्हणून डॉक्टरांनी भेट मागितली नि ती कोणी नाकारली असं कधीही झालं नाही.

त्यांचं अतिशय साधं व्यक्तिमत्त्व. साधा खादीचा हाफ शर्ट आणि पँट. डोळ्यांवर चष्मा आणि सतत हसतमुख. 'अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा' करण्यासाठी एक-दोन नव्हे तर सतत १८ वर्षे अधिवेशन काळात मुंबई आणि नागपूरच्या विधिमंडळाच्या पायऱ्या ते चढत राहिले. त्यांची ही चिकाटी आम्ही अचंबित होऊन पाहात असायचो. आमचा राजकारण्यांबद्दल असलेला भ्रमनिरास, वैफल्य आम्ही मांडत असू. पण डॉक्टर कधीही चिडलेले, हतबल झालेले मी पाहिले नाहीत. त्यांची महाराष्ट्रभर सतत व्याख्यानं असायची, वेगवेगळ्या चॅनेल्सवर मुलाखती, कार्यकर्त्यांच्या शिबिरातील भाषणं, वैयक्तिक संपर्कात चर्चा असायच्या. मोबाइल यायच्या आधी पत्रातून संवाद, नंतर एसएमएस, ई-मेल वगैरे यातून आम्ही कार्यकर्ते समृद्ध होत गेलो. हा केवळ आमचा सामाजिक उद्धार नव्हता, तर वैयक्तिक आयुष्यातसुद्धा आम्ही विवेकवादी बनत गेलो.

कौटुंबिक पातळीवरसुद्धा कालबाह्य रूढी, परंपरा नाकारताना काही वेळा ठाम निर्णय घ्यावा लागतो ते धैर्य त्यांच्यामुळे येऊ शकले. सगळ्यात महत्त्वाचं मी जे शिकलो ते हे, की वैज्ञानिक दृष्टिकोन फक्त विज्ञानात किंवा पुस्तकात नसून तो दररोजच्या आयुष्यात किती महत्त्वाचा आहे! कोणतेही एककल्ली विचार कसे घातक असतात हे आयुष्यात समजलं. अंधश्रद्धाळू माणसाला उपहासाची नव्हे, तर करुणेची गरज असते. त्यामुळे घरातील ज्येष्ठांच्याच नव्हे तर बायको, नातेवाईक यांच्या अंधश्रद्धा घालवताना त्यांना न दुखावता कसे पटवून द्यावे याचे आपोआप शिक्षण मिळाले. कुटुंबात केवळ श्रद्धा-अंधश्रद्धा यांचाच खेळ चालू नसतो तर मुलाचे शिक्षण, अचानक येणारी संकटे, आरोग्याच्या अनपेक्षित पण गंभीर तक्रारी, व्यवसायातील चढउतार, त्यासाठी घ्यावे लागणारे काही कठोर निर्णय यांना तोंड देण्यासाठीसुद्धा हाच विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनच कसा तारणहार असतो, हे अनुभवातून समजले. यांचा सामना करण्यासाठी कोणत्याही देव, धर्माची, बुवा-बाबांची, कोणत्याही पंथाच्या किंवा पारलौकिक विचारांची गरज नसते, हे ठामपणे समजले आणि अशा कुबड्यांशिवायसुद्धा आपले आयुष्याचे निर्णय घेता येतात हा आत्मविश्वास आला. हे निर्णय कधी यशस्वी होतात, कधी अयशस्वी. पण त्यांची सर्वस्वी जबाबदारी स्वतःचीच म्हणून आपण स्वीकारतो. फलज्योतिष, वास्तुशास्त्र, भ्रामक विज्ञान यांच्यामागे जाऊन आयुष्येच्या आयुष्ये कशी उध्वस्त झाली आहेत, कशी फरफटत गेली आहेत हे समजू लागलं. जातधर्माच्या साऱ्या चौकटी माणसाने हजारो वर्षांपूर्वी त्याच्या त्या वेळच्या सोयीनुसार बनविल्या. त्याची कालसुसंगत चिकित्सा व्हायला हवी. कुणाच्या शोषणासाठी त्यांचा वापर होऊ नये हे डॉक्टर नेहमी सांगत. भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येकाला आपल्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार आहे; पण हे स्वातंत्र्य अनिर्बंध नाही हे डॉक्टर लक्षात आणून देत. म्हणूनच ते कधीही नास्तिक-आस्तिकवादात उतरले नाहीत. पण तरीही हितसंबंधी लोक त्यांची बदनामी करत. ज्यांच्यासाठी डॉक्टर आणि संघटना काम करत होते तेच लोक त्यांच्याविरुद्ध उभे, असे विचित्र दृश्य आम्ही पाहत होतो. एकविसाव्या शतकातसुद्धा जातपंचायतींमुळे काही लोक आयुष्यातून उठल्याचे, अनन्वित त्रासाचे बळी झालेले बघून आम्ही व्यथित व्हायचो पण डॉक्टर केवळ व्यथित होत नव्हते, तर त्यासाठी नवीन चळवळ उभी करत होते. त्यातूनच अघोरी प्रथांविरुद्ध कायदा तयार झाला. जातपंचायतींवर निर्बंध आणणारा कायदा झाला. लौकिक आयुष्यातले प्रश्न व्यावहारिक निर्णय घेऊनच सुटणार असतात किंवा त्यांची तीव्रता तरी निश्चित कमी होते. पारलौकिक ज्ञानाचा इथे काहीही उपयोग नाही हे केवळ तर्कशुद्ध विचारांनी समजले. डॉक्टर दाभोलकरांचा 'तिमिरातुनी तेजाकडे' हा ग्रंथ म्हणजे खरोखरच अंधारातून प्रकाशाकडे जाणारा मार्गच होय. ग्रंथप्रामाण्यवाद, व्यक्तिप्रामाण्यवाद नाकारण्याचे धैर्य

डॉक्टरांमुळे आले.

संघटना पातळीवरसुद्धा डॉक्टर कसे वागत होते, त्याचे स्पष्टीकरण देत होते आणि चर्चेतून कोणताही प्रश्न सुटू शकतो याचं भान ते आणून देत होते. त्याचा उपयोग मला IMA चं काम करत असताना, भूलतज्ज्ञ (Anesthesia) असोसिएशनचा अध्यक्ष झाल्यावर निश्चितपणे झाला. अंनिसचं काम म्हणजे मतभेद, संघर्ष आलाच. पण आपले मुद्दे शांतपणे, विवेकी पद्धतीने कसे मांडावेत हे डॉक्टरांनी आपल्या कृतीतून शिकवलं. अज्ञान किंवा अर्धवट ज्ञान (अलीकडे तर व्हॉट्सॲप विद्यापीठ) हेच अनेक गैरसमजांना जन्म देत असतात. त्यासाठी आपण खूप ज्ञानी आहोत या अविर्भावात नव्हे, तर समोरच्याची मानसिकता व मनोवस्था पाहून आपलं म्हणणं कसं पटवून द्यावं हे डॉक्टर सांगत. सतत वास्तवाची तपासणी (Fact Check) करत राहिलं पाहिजे, भवतालच्या आधुनिक ज्ञानाशी पडताळून आपलं कालबाह्य ज्ञान किंवा समज बदलले गेले पाहिजेत, यावर त्यांचा कटाक्ष होता.

त्यांनी सांगितलेले विचार कार्यकर्त्यांनी पाळलेच पाहिजेत, असं ते कधीही सांगत नव्हते. तुम्ही त्यावर विचार करा आणि पटले तर अंमलात आणा असाच त्यांचा आग्रह होता. दररोजच्या जीवनात मी तसा वागत गेलो. त्यातून निदान कुटुंबियांचा तरी विश्वास मला मिळाला. मी अभिमानाने आज सांगू शकतो की, माझा मुलगा देखील आज विवेकवादी विचारांचा पाईक बनला आहे. जात, धर्म यापलीकडे माणूस म्हणून विचार करू लागला आहे. एक जबाबदार नागरिक आणि उत्तम माणूस झाला आहे. त्याच्या व्यावहारिक यशाची, त्याने किती पैसा मिळवावा, कोणाशी लग्न करावे यासाठी तो स्वतंत्र असून त्याबाबत मी निरपेक्ष आहे अशा गोष्टी त्याच्या वकुबानुसार, मेहनतीवर त्याला मिळत राहतील.

आणि अखेर ज्यांच्यासाठी डॉ. दाभोलकर आयुष्यभर लढले, त्यातील काही माथेफिरूंनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. आम्हा कार्यकर्त्यांवर आभाळ कोसळलं. पण तरीसुद्धा कोणीही भावनेच्या भरात कोणतीही वाईट कृती किंवा शब्दसुद्धा उच्चारला नाही. त्यांच्या अंत्यदर्शनाला कोणीही धडाधड गाड्या काढून सातारला गेले नाही. दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांनी सगळ्यांना विवेकाचे आवाहन केले होते. तीच त्यांना खरी आदरांजली होती. त्यानंतर उलट कार्यकर्ते पेटून काम करत आहेत. ३०० हून अधिक अंनिसच्या शाखा कार्यरत आहेत. बुवा-बाबांचे भांडाफोड चालू आहेत.

वैयक्तिक पातळीवर मला अश्रू आवरले नाहीत. पण माझं रूटीन कुठेही डिस्टर्ब न करता माझं काम चालू राहिलं. त्यांचे विचार कायम माझ्या सोबत असतात. एखाद्या प्रसंगी डॉक्टर कसे वागले असते असा विचार करून मीही माझ्या पद्धतीने त्याला तोंड देत असतो. दुसरे आपल्याशी जसे वागले तर दुःख होईल तसे आपण वागू नये इतकी जीवनाची साधी, सोपी व्याख्या त्यांनी सांगितली होती. सातत्य, संघर्ष आणि संयम ह्या त्रिसूत्रीवर आधारित आचार, विचार, आहार, विहार यांचे पालन करण्यास ते आम्हाला नेहमी उद्युक्त करत. म्हणूनच विज्ञान, निर्भयता आणि नीती बाळगून आम्ही कार्यकर्ते आज जीवनक्रमण करीत असतो. याहून अधिक प्रेरणा काय असू शकेल?

(लेखक भूलतज्ज्ञ असून महा.अंनिसचे नाशिक जिल्हाध्यक्ष आहेत.)

●

**वार्ता अंधश्रद्धेच्या : जातपंचायतीची अघोरी शिक्षा, युवकाला जिवंत जाळले**

आसाममधील नागाव जिल्ह्यातील बोर लालुंग भागात एक हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. जातपंचायतीप्रमाणेच कार्यरत असलेल्या कंगारू न्यायालयात एका हत्येप्रकरणी ३५ वर्षीय रणजीत बोरदोलोई या आरोपीची सुनावणी सुरू होती. सुनावणीदरम्यान आरोपी दोषी आढळल्यामुळे त्याला जिवंत जाळण्याचा आदेश देण्यात आला आणि तात्काळ तो अमलात आणला देखील. याच न्यायालयाने यापूर्वी खून आणि बलात्कार करण्याचे निवाडेदेखील दिलेले आहेत. जातपंचायत आणि पंचमंडळींचे निवाडे किती अघोरी असतात याची प्रचिती यानिमित्ताने समोर आलेली आहे.



# न संपलेला माणूस

डॉ.श्यामसुंदर मिरजकर
९४२११२१२३५२

बातमी शहरभर धुक्यासारखी पसरली
डॉक्टर गेले
कुणीतरी गोळ्या झाडल्या त्यांच्यावर.
सर्वत्र सन्नाटा
मग कुजबुज.....चर्चा.
ज्योती म्हणाली,
आज रक्षाबंधन नाही.
गेलं पाहिजे मला साताऱ्याला कार्यकर्त्यांसोबत.
एक उत्तेजित गृहस्थ म्हणाले,
''सारखी सारखी टीका करायची आमच्या धर्मावर
किती सहन करायचं ?
पापाचा घडा भरला होता त्यांचा
मुक्ती मिळेल त्यांना
धर्मरक्षकाच्या हातून मृत्यू म्हणजे
बाकीच्यांनी शहाणं व्हावं आता''.
कार्यकर्ते जमून होते एकत्र
राख पांघरूण धुमसत होते आतल्या आत.
तीन छोट्या मुली खेळत होत्या.
मध्येच एक म्हणाली,
''डॉक्टर मेले.....म्हणजे मारले त्यांना कुणीतरी
म्हणजे मला असं म्हणायचंय की
त्यांना मरायचं नव्हतं, तरी ते मेले
त्यांच्या अनेक इच्छा बाकी असतीलच ना!
मग ते आता भूत होतील की काय ?''
''छट्'' दुसरी उसळून म्हणाली,
''डॉक्टर कधीच भूत होणार नाहीत.''
''कशावरून ? तुला कुणी सांगितलं ?'' पहिलीनं विचारलं.
''मला डॉक्टरांनी सांगितलंय
घरी आले तेव्हा,
माणूस मेल्यावर कधीच भूत होत नसतं
त्या लोकांच्या समजुती आहेत, बेटा!''
तिसरी म्हणाली,
''हो, मला पण सांगितलंय
भूतबित काही नसतं म्हणून...!''
दुसरी म्हणाली,
''तुला ग कधी भेटले ?
ओळख तरी आहे का तुमची ?''
तिसरी उत्तरली,
''पुस्तकं आहेत ना पण आमच्याकडे त्यांची
त्यात त्यांनी हेच सांगितलंय
ओळखते मी डॉक्टरांना खूप दिवसांपासून...''
कपाटामधील त्यांच्या पुस्तकांवरून नजर फिरवताना
विस्कटत गेली नरेंद्र दाभोलकर ही अक्षरे.
'तिमिरातून तेजाकडे प्रवास करताना
हा बाप माणूस कायम सोबत असेल',
मी स्वतःशीच म्हणालो.
अक्षरांचे दिवे करून
नव्या वाटा धुंडाळण्यासाठी चालू लागलो.

•

## विचारधन

परिवर्तनवादी चळवळीतील लढे कधीच व्यक्तिगत नसतात. ते संघटनेच्या सामुहिक निर्धाराचे प्रतीक असतात. अनेक कार्यकर्त्यांच्या जिवापाड परिश्रमातून ही लढाई लढली गेली आहे. लढली जात आहे. त्या कार्यकर्त्यांची जिद्द, उत्साह आणि समर्पित भावना हाच खरा या लढ्यांचा कणा आहे.

**– शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर**



# हव्यास गुप्तधनाचा

संजय बनसोडे
९८५०८९९७१३

गुप्तधनाच्या हव्यासापोटी मांत्रिकाच्या नादाला लागून अख्खे कुटुंबच संपल्याची हृदयद्रावक घटना सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ येथे नुकतीच घडली. अंधश्रद्धेची अशी घातचक्रे अजूनही सुरूच असल्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाचे महत्त्व प्रकर्षाने अधोरेखित झाले आहे.

एकाच कुटुंबातील नऊ जणांच्या आत्महत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. दि.२० जून २०२२ रोजी सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ (ता. मिरज) येथील पशुवैद्यक डॉ. माणिक वनमोरे, माध्यमिक शिक्षक पोपट वनमोरे या सख्ख्या भावांच्या कुटुंबातील नऊ जणांचा विष प्रयोगांनी मृत्यू झाला. खाजगी सावकारीतून ही सामूहिक आत्महत्या असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला गेला होता. परंतु गुप्तधन, मांत्रिक, सावकारी कर्ज असे वेगवेगळे मुद्दे पुढे येत होते. या भावांनी सावकारी कर्जाच्या ओझ्याखाली दबून कुटुंबाला विष पाजून स्वतः आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक तर्क होता. मात्र तपासाची चक्रे गतिमान झाल्यानंतर खऱ्या गोष्टी पुढे येऊ लागल्या. या सामूहिक आत्महत्या नसून मांत्रिकाने या कुटुंबाचा काटा काढला, गुप्तधन काढून देतो म्हणून फसवून विष पाजले असल्याचे तपासात पुढे निष्पन्न झाले आहे.

शिक्षित असलेले डॉक्टर माणिक वनमोरे, पोपट वनमोरे यांना गुप्तधन शोधण्याचा नाद लागला होता. गेली काही वर्षे या दोघा भावांच्या संपर्कात सोलापूर येथील मांत्रिक अब्बास बागवान हा आला. 'गुप्तधन शोधून देतो' असे सांगून सदर मांत्रिकाने वेळोवेळी या भावंडांकडून लाखो रुपये उकळले होते. मांत्रिकाचे पैसे देण्यासाठीच त्यांनी काही सावकारांकडून कर्जे घेतली होती. मांत्रिकाच्या आमिषाला बळी पडून ते लाखो रुपयांनी कर्जबाजारी झाले होते. गुप्तधन मिळत नसल्याचे लक्षात आल्यावर वनमोरे बंधूंनी मांत्रिकाकडे पैशाचा तगादा लावला होता. त्याचवेळी मोठी आर्थिक लूट केलेल्या मांत्रिकाने या कुटुंबाचा काटा काढण्याचे ठरवले. आता आपल्याला गुप्तधन मिळण्याची वेळ जवळ आलेली आहे, १९ जून या तारखेला हे गुप्तधन प्राप्त होईल, त्यासाठी काही विधी करण्याचे ठरले. त्यानुसार मांत्रिक बागवान व त्याचा चालक, सहकारी धीरज सुरवसे १९ तारखेला सोलापूरहून म्हैसाळ येथे आले. रात्री डॉ. माणिक यांच्या घरी दोघांनी जेवण केले. या दाम्पत्यास अकराशे गहू काढून दिले व हा विधीचा भाग असल्याने ते सात वेळा मोजण्यास सांगितले. यादरम्यान मांत्रिकाने प्राणघातक विषाच्या गोळ्या आणल्या होत्या, त्याची पावडर करून ती नऊ बाटल्यांमध्ये आधीच द्रवात मिसळली होती. रात्री एकच्या सुमारास पोपट वनमोरे यांचे कुटुंब या मांत्रिकाने संपवले. त्यांची पत्नी संगीता व मुलगी अर्चना यांना हे विष दिले. खरंतर हा विधी करण्यासाठीच बँकेत नुकतीच नोकरीला लागलेली अर्चना आणि तिच्यासोबत असणारी आजी अक्काताई यांना कोल्हापूरहून बोलावून घेतले होते. इथला विधी झाला म्हणून त्या घरातील पोपट यांचा मुलगा शुभम याला घेऊन मांत्रिक पहाटे चारच्या दरम्यान डॉ.माणिक यांच्या घरात आले. तिथे शुभम, डॉ.माणिक, त्यांची पत्नी रेखा, आई अक्काताई, मुलगी प्रतिमा, मुलगा आदिनाथ यांना विष देऊन या घरात सहा जणांना संपवले. हे कृत्य करताना दोन्ही कुटुंब प्रमुखांच्या खिशात चिठ्ठ्या ठेवून पसार झाले. दोन्ही घरात वेगवेगळ्या खोल्यात हे नऊ मृतदेह आढळले. दि.२० जून रोजी सकाळी ही घटना निदर्शनास आली. चिठ्ठ्यांमध्ये काही सावकारांची नावे होती. त्यानुसार प्राथमिक तपास करून पोलिसांनी २५ सावकारांविरुद्ध गुन्हा दाखल केला, १९ सावकारांना अटक केली.

एकाच वेळी दोन वेगवेगळ्या घरात राहाणारे नऊ जण कशी काय आत्महत्या करू शकतात?

दोन्ही घरांचे पुढील दरवाजे बंद होते, तर दोन्ही घराचे मागील दरवाजे उघडे होते? हे दोघे भाऊ बुवा-बाबा, मांत्रिकाच्या नादाला लागले असल्याची गावात

चर्चा होती. पोलिसांनी गावातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले, काही फोन चेक केले. तपासाअंती या आत्महत्या नसून हत्या असल्याचे पुढे आले आहे. मांत्रिक अब्बास बागवान (सोलापूर), त्याचा साथीदार धीरज सुरवसे यांना पोलिसांनी अटक केलेली आहे. बागवानवर आठ वर्षांपूर्वी गुप्तधन मिळवून देतो म्हणून फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यातून तो सुटला होता. मात्र, त्याचा बुवाबाजीचा धंदा सुरूच होता. बागवान याने गोळा केलेले पैसे त्याच्या बहिणीकडे ठेवल्याचे तपासात पुढे आले आहे. पोलीस मांत्रिकाच्या बहिणीचा शोध घेत आहेत. या प्रकरणात विषारी औषधाच्या गोळ्या देणारा मांत्रिकाचा मित्र मनोज चंद्रकांत पवार (सध्या मुक्काम तळेगाव दाभाडे, मूळगाव – सोलापूर) यास पोलिसांनी अटक केली आहे. मृतांना कोणते विष दिले गेले, हेही अद्याप समजलेले नाही. या प्रकरणात खुनाचा गुन्हा, सावकारी कायदा, ॲट्रॉसिटी कायदा, जादूटोणाविरोधी कायदा याअंतर्गत मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत. जिल्हा पोलीस प्रमुख दीक्षित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक अशोक वीरकर आदी अधिकारी तपास करीत आहेत.

उच्चशिक्षित, आर्थिक सुस्थितीतील वनमोरे कुटुंबीय केवळ पैशाच्या आमिषाने अंधश्रद्धेत अडकल्याने मांत्रिकाची शिकार झाले. गेल्या महिन्यात राज्यात दोन ठिकाणी पैशाचा पाऊस पाडतो म्हणून लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे गुन्हे दाखल झाले आहेत. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे, विवेक जागृत ठेवता आला पाहिजे, चिकित्सक वृत्ती जोपासली गेली पाहिजे. मात्र, असे न घडल्यामुळे हा अनर्थ घडला. आधुनिक काळात अंधश्रद्धांना बळी पडणं हा मानवजातीला कलंक आहे. अंधश्रद्धा या माणसाच्या विकासाच्या आड येतात. महाराष्ट्रातील अनेक संत-सुधारकांनी अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार दिला; तो आपण समजून घेतला पाहिजे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही गेली ३३ वर्षे सातत्याने अंधश्रद्धा, बुवाबाजीविरुद्ध संघर्ष करीत आहे. किमान तरुणाईने तरी अशा सामाजिक चळवळीशी जोडून घेतले पाहिजे. या प्रकरणातील गुन्हेगारांना शिक्षा जरूर होईल. मात्र, आपल्या समाजातील नऊ जणांना अंधश्रद्धा मानसिकतेमुळे प्राणास मुकावे लागणे ही मोठी शोकांतिका आहे. यानिमित्ताने बुवाबाजीला हद्दपार करण्याचा निर्धार करूया, विवेकाचा आवाज बुलंद करण्यास कटिबद्ध राहूया.

दरम्यान, २१ जून २०२२ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सांगली जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पत्र दिले होते. या पत्रात म्हटले होते की, सामूहिक आत्महत्या प्रकरणी आर्थिक फसवणूक किंवा गुप्तधनाच्या आमिषाने कर्जबाजारीपणा आला असण्याची शक्यता असल्यास वनमोरे कुटुंबीय कर्जबाजारी होण्याला कोणत्या गोष्टी जबाबदार आहेत? याचा तपास करावा. गुप्तधनाचा शोध घेण्यासाठी कोणी मार्गदर्शन केले? याची शक्यता तपासयंत्रणांनी पडताळून पाहावी. या घटनेमागे बुवाबाजी करणारे कोणी मांत्रिक आहेत का? याचाही तातडीने तपास करावा. या आशयाचे निवेदन महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, सांगली जिल्हा उपाध्यक्ष के.डी.शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अजय भालकर, इस्लामपूर शाखा कार्याध्यक्ष बी.आर.जाधव, प्रधानसचिव सूरज पाटील, प्रा.अर्जुन पन्हाळे यांनी प्रत्यक्ष भेटून पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. तसेच घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन स्थानिक लोकांकडे या प्रकरणाची चौकशी केली होती.

(लेखक महा.अंनिसचे राज्य प्रधानसचिव आहेत.)

●

## विचारधन

परिस्थितीच्या मर्यादेत प्रामाणिकपणे, धैर्याने, माणूसकीने त्यांना सामोरे जाणे आणि त्यावर उत्तर शोधणे, यातच खरी माणूसपणाची कसोटी आहे. हे सामर्थ्य देण्याचे सर्वात प्रभावी ऊर्जाकेंद्र म्हणून कुटुंबातील वातावरण बदलणे, सजग व सक्रिय करणे, हाच कुटुंबातील अंधश्रद्धा निर्मूलनाचा प्रभावी मार्ग आहे.

**– शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर**



# पुरोगामी विचाराचा प्रतिभासंपन्न संतकवी : सावता माळी

डॉ. जी. पी. माळी
९४२०९३१२४०

गौतम बुद्ध, भगवान महावीर, चक्रधरस्वामी, संत बसवेश्वर आणि संत ज्ञानेश्वर या पाच महामानवांनी भारतभूमीत जे विचारमंथन कालपरत्वे जनमानसात रुजवले त्याचा प्रभाव आणि परिणाम पुढील काळात अनेकांच्या उक्ती-कृतीतून पाझरत राहिले. लेखनातून, वर्तनातून आणि कार्यकर्तृत्वातून अभिव्यक्त झालेले हे वैचारिक पंचप्राण व्यापक विश्वकल्याणाच्यादृष्टीने अतिशय हितकारक आणि उपकारक ठरले. आपल्या महाराष्ट्राचा आणि मराठी सारस्वताचा विचार करता अनेक संतांची मांदियाळी नजरेला पडते. धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील प्रत्येक छोट्या-मोठ्या संतांचे योगदान लक्षणीय स्वरूपाचे असल्याचे लक्षात येते. एकनाथ, नामदेव, तुकाराम, यांच्याप्रमाणेच सेना न्हावी, गोरा कुंभार, सावता माळी, बंका महार, विसोबा खेचर, नरहरी सोनार, चोखामेळा, कर्ममेळा, मन्मथ स्वामी, बसवलिंग, फादर स्टीफन्स, फादर कुआ, शेख महंमद हुसेन अंबरखान, ब्रह्म महतिसागर, जनाबाई, मुक्ताबाई, महदंबा, सोयराबाई, वेणाबाई, बहिणाबाई इत्यादी विविध जाती-धर्मांतील संतांनी कमी-अधिक प्रमाणात लेखन करून भावभक्तीचा मळा फुलवत आपापल्या मगदुरानुसार समाजप्रबोधनाचाही सारासार प्रयत्न केल्याचे जाणवते. अर्थात, अध्यात्म किंवा ईश्वरभक्ती हा सर्वांच्याच लेखनाचा केंद्रबिंदू असला, तरी त्या विशिष्ट काळाला आणि परिस्थितीला अनुसरून त्यांनी स्वीकारलेली भूमिका आणि लोककल्याणार्थ मांडलेले विचार महत्त्वाचे ठरतात. संतांच्या आचार-विचाराला स्थल-काल आणि परिस्थितीच्या चौकटीच्या मर्यादा आवर्जून लक्षात घेऊनही संतांच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेणे आणि त्याविषयी आदरभाव प्रकट करणे क्रमप्राप्त ठरते.

**ज्ञानदेव-नामदेवांचे समकालीन**

संतमंडळात 'आध्यात्मिक लोकशाही' नांदत असल्याची यथार्थ नोंद संतसाहित्याचे गाढे अभ्यासक आणि मराठी वाङ्मयेतिहासाचे साक्षेपी अभ्यासक डॉ. ल. रा. नसिराबादकर यांनी 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' या ग्रंथात केलेली असून ती अत्यंत औचित्यपूर्ण आहे. कारण पंढरीच्या वाळवंटाच्या परिसरात येणारे अठरापगड जातीचे संत विठ्ठलभक्तीत गढून जात. संत सावता माळी हे त्यापैकीच एक. ते ज्ञानदेव-नामदेवांचे समकालीन होते. इ.स.१२७५ ते १२९६ हा संत ज्ञानेश्वरांचा कालखंड, तर इ.स.१२५० ते १२९५ हा सावता माळी यांचा कालखंड. त्यांना सुमारे ४५ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांनी एकूण किती अभंग लिहिले असावेत याबाबत काहीही सांगतात येत नाही; परंतु त्यांचे सुमारे ४० अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या अभंगलेखनाचा संख्यात्मक विचार न करता गुणात्मक विचार करणे अधिक उचित ठरते. कारण त्यांनी किती लिहिले यापेक्षा काय लिहिले हे महत्त्वाचे आहे.

सोलापूर जिल्ह्यातल्या पंढरपूर या तीर्थक्षेत्रापासून जवळच असलेले अरणभेंडी हे सावता माळी यांचे जन्मगाव. परसूबा आणि नांगिताबाई या दांपत्यापोटी त्यांचा जन्म झाला. गावातील हे एक सामान्य शेतकरी कुटुंब होते. चारचौघांप्रमाणे शेतीवाडी करून ते आपली उपजीविका चालवत असत. पण या कुटुंबाचा आध्यात्मिकतेकडे खूप ओढा होता. आध्यात्मिक वृत्ती त्यांच्या नसानसांत भिनली होती. हरिभजनात अखंड दंग होण्याची त्यांची मनोवृत्ती होती. पंढरीच्या विठ्ठलावर त्यांची नितांत श्रद्धा होती. या कुटुंबाची गावात आणि परिसरात सात्त्विक व सदाचारी प्रवृत्तीचे म्हणून ख्याती होती. परोपकारी स्वभाव हा या कुटुंबाचा वेगळेपणा आणि मोठेपणा म्हणून माहिती होता. त्यामुळे सर्वांना या दांपत्याविषयी आदर, जिव्हाळा, प्रेम, आपुलकी आणि सहानुभूती वाटणे स्वाभाविकच होते.

**भक्तीरसाचे बाळकडू**

अशा भक्तीरसपूर्ण आणि संस्कारसंपन्न कुटुंबात व वातावरणात सावता माळी लहानाचे मोठे झाले. भक्तीरसाचे बाळकडू प्राशन करतच त्यांना विठ्ठलभक्तीची दीक्षा प्राप्त झाली. वयात आल्यानंतर आई-वडिलांनी जनाबाई नावाच्या सुस्वरूप आणि सद्गुणी युवतीशी

त्यांचं लग्न लावून दिलं. पण प्रपंचापेक्षा परमार्थातच या दाम्पत्याचे मन अधिक रमले. देहभान विसरून नामस्मरण आणि विठ्ठलभक्तीत गढून जाणारे जोडपे म्हणून ते अरणभेंडीच्या पंचक्रोशीत सर्वपरिचित झाले. असे असले तरी त्यांच्या विठ्ठलभक्तीचे स्वरूप फारच वेगळे होते. उच्चनीचता न मानता आणि पुराणातल्या भाकडकथांचे थोतांड न माजवता भक्ती करण्याकडे त्यांचा कल होता. म्हणूनच एका अभंगात ते म्हणतात–

‘प्रपंची असूनही परमार्थ साधावा।
वाचे आठवावा पांडुरंग।।
उच्च नीच काही न पाहे सर्वथा।
पुराणीच्या कथा पुराणीच।।’

**प्रतिभासंपन्न विठ्ठलभक्त**

मराठी संतसाहित्यातील थोर संतांनी विठ्ठलाचे गुणगान करताना सुंदर शब्दांची आतषबाजी केल्याचे दिसून येते. ‘सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया।।’ हे संत तुकारामांनी केलेले वर्णन असो की रूप ‘पाहता लोचनी। सुख झाले हो साजणी।।’ हे ज्ञानदेवांनी केलेले वर्णन असो, रसिक वाचक व श्रोते त्याचा आस्वाद घेताना आनंदात बुडून जातात. या पार्श्वभूमीवर सावता माळी यांनी केलेले विठ्ठलाचे वर्णनही तेवढेच समर्पक व अलंकारिक आहे. ते लिहितात–

‘विठ्ठलाचे रूप अतर्क्य विशाल।
हृदयकमळ मंत्रसिद्ध।।१।।
दिगंबर मूर्ती गोजरी सावळी।
तोडे पाया वाळी मनगटी।।२।।
कटीवर हात, हाती पद्म शंख।
पुष्पकळी मोख अंगुलित।।३।।
सावता माळी म्हणे शब्दब्रह्म साचे।
नाम विठ्ठलाचे कलियुगी।।४।।’

**व्यवसाय हाच विठ्ठल**

व्यवसाय हाच विठ्ठल मानून आपापल्या व्यवसायात रममाण होण्याची वृत्ती सर्वच जातीच्या संतांच्या ठायी असल्याचे दिसून येते. यास सावता माळीही अपवाद नाही. सोनारकाम, कुंभारकाम, न्हावीकाम याच धर्तीवर आपणही माळीकामाच्या माध्यमातून विठ्ठलभक्ती करत असल्याचे त्यांनी आपल्या अभंगातून स्पष्ट केलेले आहे.

‘कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी ।।१।।
लसूण मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी ।।२।।
मोट, नाडा, विहीर दोरी। अवघी व्यापली पंढरी ।।३।।
सावता म्हणे केला मळा। विठ्ठल पायी गोविला गळा ।।४।।’

‘कायकवे कैलास’ अर्थात ‘कर्मातूनच कैलास–मोक्ष’, हा विचार रूजवून बसवेश्वरांनी श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विशद केले. तद्वतच 'Work is Worship' अर्थात ‘कर्म हीच पूजा’, हाच वैचारिक धागा आमच्या संतांच्या जीवनाचे सूत्र होते आणि त्यानुसारच त्यांनी व्यवसाय हाच विठ्ठल मानून ते कर्मपूजा करीत राहिले.

**कर्मकांडाला विरोध**

सावता माळी यांचे आजच्या भाषेत सांगावे असे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते समकालीन पुरोगामी वा सुधारणावादी होते. त्यांच्या नावावर काही चमत्कारांचा उल्लेख केला जात असला, तरी विज्ञानाच्या निकषांवर त्यांना कसलाही आधार नाही. त्यांच्याविषयी सांगितले जाणारे चमत्कार बुद्धिप्रामाण्यवादावर अढळ निष्ठा असलेल्यांना कदापि मान्य होणे शक्यच नाही. किंबहुना विठ्ठलाच्या उत्कट भक्तीची जोपासना करताना त्यांनी कर्मकांडाला दूर सारण्याचा विचार आपल्या अभंगातून मांडला. ते म्हणतात–

‘साधनाची आटाआटी। कासया पाटी लाविता ।।१।।
एक तुमचे नामचि पुरे। हेचि पुरे साधन ।।२।।’

विठ्ठलाच्या भक्तीसाठी केवळ नामस्मरण पुरे असून त्यासाठी पोथ्या–पुराणांची, मंत्रतंत्रांची अजिबात आवश्यकता नाही, असे प्रतिपादन त्यांनी केल्याचे प्रस्तुत अभंगातून स्पष्ट होते.

**विषमतेचा तिरस्कार–समतेचा पुरस्कार**

पंढरीच्या वाळवंटावर जातीभेदाला आणि उच्च–नीचतेला मूठमाती देऊन समतेचा आणि मानवतेचा पुरस्कार करण्याचे ऐतिहासिक कार्य आमच्या सर्वच संतकवींनी यथाशक्ती पार पाडले आहे. संत सावता माळी हेही याला अपवाद नाहीत. काळाच्या मर्यादा लक्षात घेता त्यांचेदेखील कार्य निश्चितच प्रशंसनीय आहे. कारण त्यांनीही आपल्या अभंगातून समता, बंधुता, दया, मानवता यातूनच एकता व समानता ही संतपरंपरा अनुसरल्याचे– ‘ब्राह्मण महार धर्मपंथ जाती।नसे भगवंती भेदाभेद।।’ अशा शब्दांतून स्पष्ट होते. सावता माळी यांच्या लेखणीतून प्रस्तुत झालेली या प्रकारची शब्दकळा वाचताना महात्मा फुले यांनी आपल्या अखंडामधून लिहिलेली, ‘ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणाशी। धरावे

पोटाशी बंधूपरी।।' या उक्तीची प्रकर्षाने आठवण होणे स्वाभाविकच आहे. महात्मा बसवेश्वरापासून महात्मा फुलेंपर्यंतच्या महामानवांनी वर्षानुवर्षांच्या विषम वर्णव्यवस्थेला विरोध करून समता आणि मानवता प्रस्थापित करण्याचं कार्य केलं. एका अभंगात जातीपातीत न अडकता क्रियाकर्म करत राहाण्याचा उद्देश स्पष्ट करताना सावता माळी म्हणतात–

'जपतप क्रिया धर्म साधन। वावगे बंधन उपाधीचे ।।१।।
येणे काय घडे समाधान सर्वथा। वावुगाची झीज व्यथा होत आहे ।।२।।
सावता म्हणे सार कंठी धरा नाम। नको दुजा नेम वावुगाची ।।३।।'

संत सावता माळी म्हणजे तत्कालिन संतमंडळातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व होते. अल्पायुष्य वाट्याला आलेल्या या संताने केलेला श्रमसंस्कृतीचा पुरस्कार आणि कर्मकांडांचा निषेध आजच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. त्यांचे लेखन कमी असले तरी त्यातील आशय महत्त्वाचा आहे. त्यामागील त्यांची तर्कशुद्ध व प्रामाणिक तात्त्विक भूमिका अनुकरणीय आहे. मध्ययुगातही समाजप्रबोधनाचा मळा पिकविणारा हा माळी आज धर्माच्या नावाने समाजात विविद्वेष पसरवून राजकीय पोळी भाजून घेण्याच्या सध्याच्या काळात अधिकच प्रस्तुत ठरतो. सावता माळी नावाचा हा संत मध्ययुगाच्या अंधारात दीपस्तंभाप्रमाणे कार्य करत होता, याचे आवर्जून स्मरण करणे आणि त्याची प्रस्तुतता समजून घेणे ही काळाची गरज आहे.

(लेखक यशवंतराव चव्हाण कॉलेज, कोल्हापूरचे माजी प्राचार्य आहेत.)

●

---

**(पान नं. ६ वरुन)**

विषमतामूलक अर्थव्यवस्था नष्ट करणे एवढाच नाही, तर तो एक फार मोठ्या माणसाचे माणूसपण आणि स्वतंत्रपण जागृत करणारा सांस्कृतिक लढाही आहे, हे विसरून चालणार नाही. डॉक्टरसाहेब याचे कृतिशील भान तुम्ही मला आणि माझ्या पिढीला दिले. चांगले जग निर्माण करण्यासाठी माणसे नव्हेत, तर दुष्ट वृत्ती नष्ट कराव्या लागतात, हे महान तत्त्व गौतम बुद्ध, येशू ख्रिस्तापासून आधुनिक युगात महात्मा गांधीपर्यंत सर्व महात्म्यांनी आपल्या तत्त्वबोधक जगण्यातून वारंवार जगाला दाखवून दिले आहे. यांचाच वारस म्हणून तुम्हीही याच भूमिकेतून आयुष्यभर कार्यरत राहिलात आणि अखेर हीच भूमिका अंनिसचे मुख्य ध्येय करून या भूमिकेला चळवळीचे स्वरूप दिले. जगभरच्या विविध चळवळींच्या पार्श्वभूमीवर तुम्ही समाजक्रांतीच्या चळवळीला दिलेले हे विधायक आणि निर्णायक असे क्रांतिकारी स्वरूप होते.

कुठल्याही विधायक चळवळीचे विरोधक निष्प्रभ होतात; पण समूळ नष्ट होत नसतात. तुम्ही सुरुवात केलेल्या या विवेकवादी चळवळीचे असेच काहीसे झालेले आहे. शत्रू जेव्हा भारी ठरतो, तेव्हा त्याच्यात फूट पाडून त्याची ताकद कमी करण्याचा प्रयत्न केला जातो, हीच रणनीती आपल्या शत्रूने अंगीकारली. व्यवस्थेलाच आव्हान ठरू लागलेल्या आपल्या संघटनेला दुफळीची कीड लावली गेली. तात्त्विकतेच्या नावाखाली भौतिक फायद्यांसाठी संघटनेत दुहीची बीजे पेरली. वज्रशक्ती दुबळी करण्याचा एक जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला आणि केला जात आहे. या कलहाला आपल्याच संघटनेतील कार्यकर्ते सैनिक बळी पडत आहेत. आपल्या शत्रूला नेमके हेच हवे आहे. खरेतर एक आदर्श समाज निर्माण करू पाहाणाऱ्या सर्वच विधायक चळवळींना आपला समान शत्रू बेकीची चूड लावत आहे आणि आपण सारेच त्याला बळी पडत आहोत. हे एक भयावह आणि उद्विग्न असे समाजचित्र मी पाहातो आहे. अशा वेळी डॉक्टर सर्व महामानवांबरोबर तुमचीही खूप आठवण येते आहे. कारण मी पाहातो आहे, संपूर्ण जगच इतिहासाच्या एका निर्णायक टप्प्यावर उभे आहे. जगाला गुलाम बनवून मध्ययुगीन काळात नेणाऱ्या सर्व प्रतिगामी शक्ती एकवटल्या आहेत. सर्व पुरोगामी विचारांच्या माणसांनी निर्माण केलेली राज्यव्यवस्थाच वापरून ते आपले कुटील हेतू साध्य करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. बाह्यतः ते त्यात यशस्वी होतानाही दिसतायेत. काळ खरंच आणीबाणीचा आहे. तुम्ही देहरूपाने आमच्यात नाही. पण तुम्ही रुजवलेले क्रांतिकारक विचार आणि वैज्ञानिक दृष्टी, 'होय, आम्ही दाभोलकर' ही भूमिका आम्हा सर्व कार्यकर्त्यांत रुजवून आम्ही निर्णायक संघर्षाला सिद्ध होत आहोत. तुमच्या विचारांचे बळ आमच्या मस्तकात घट्ट राहू दे !

(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आहेत.)

●



# काळ्या घोड्याची नाल

विलास निंबोरकर
८६०५९४०१६९

नुकतीच मिसरुडे फुटलेले उत्तरप्रदेशातून आलेले दोन युवक आपला काळा घोडा घेऊन गडचिरोली शहरात गल्लोगल्ली फिरत होते. त्यांच्याकडील पूर्ण काळ्याभोर रंगाच्या घोड्याच्या खुरांना ठोकून नंतर काढलेली नाल घरात ठेवली तर कुटुंबात कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्‌भवत नाहीत अशी जाहिरात करीत ते हिंडत होते. नालसारख्याच शनीच्या अंगठ्या, घोड्याचे केस व नखे टाकून मंत्राने भारलेले ताईत अशा त्यांच्याकडील वस्तू घरात ठेवण्याचे पुढील फायदे पटवून देत ते घरोघरी फिरत होते– शनीची वक्रदृष्टी किंवा साडेसाती लागत नाही, महादशा आपोआप मिटतात, राहु–केतूचे अरिष्ट दूर होतात, इत्यादी.



आधी घोड्याच्या खुरांना खिळे ठोकून लोखंडी नाल लावायची आणि नंतर काढली की ती नाल काही विशेष गुणधर्मांची बनते असे सांगत दैवभोळ्या गरजूंना विकायची. ही गोष्ट मुस्लीम समाजातील एका जागरूक महिलेच्या तर्कबुद्धीला काही पटली नाही. नाल, अंगठ्या, तावीज यांचा असा बाजार यांचा मांडून लोकांची होणारी फसवणूक थांबवण्याचे तिने ठरवले. तुम्ही लोकांना मूर्ख बनवून त्यांची लुबाडणूक करता; अशा प्रकारचा थोडाफार वाद तिने त्यांच्याशी घालून पोलिसात तक्रार करण्याची धमकीसुद्धा दिली. त्यामुळे ती मुले तिथून पळ काढण्याच्या प्रयत्नात होती. परंतु ही मुले इथून पुढे गेल्यावर ती आणखी कोणाला तरी गंडा घातल्याशिवाय राहाणार नाहीत अशा विचाराने त्यांचा योग्य प्रकारे प्रतिबंध करावा म्हणून तिने प्राणीमित्र श्री. अजय कुकडकर यांच्याशी संपर्क साधला. मी महा. अंनिसचा गडचिरोली जिल्ह्याचा माजी जिल्हा कार्याध्यक्ष व विद्यमान प्रकाशने वितरण विभाग प्रमुख असल्याने अजय यांनी माझ्याशी संपर्क केला. वेळ सुमारे दिवसा चार वाजताची होती. अजय तातडीने तिथे पोहोचले. तोपर्यंत त्या महिलेने त्या मुलांना बोलण्यात गुंतवून थोपवून धरले होते.

अजय यांनी त्यांची विचारपूस करून त्यांना समज दिली; तेव्हा यापुढे असा धंदा न करता गडचिरोली सोडून जाण्यास ते कबूल झाले. अजय यांनी फोन करून मी येण्याची गरज नसल्याचे सांगितले. परंतु फिरस्त्या लोकांच्या फसवणुकीच्या प्रकारात त्यांची तोंडी कबुली काहीच भरवशाची नसते. हे लोक असाच उपद्रव पुढे चालू ठेवतात. म्हणून मी अजय कुकडकरांना सुचविले की, तुम्ही त्यांना असेच सोडून देऊ नका, त्या मुलांकडून लेखी आश्वासन दिल्यानंतरच त्यांना जाऊ द्या. परंतु अजयने म्हटले की, अशी सर्व कारवाई करण्यासाठी मलाच यावे लागेल. मी गडचिरोली जिल्ह्याचे बुवाबाजी संघर्ष कार्यवाह श्री. प्रशांत नैताम यांना याबाबत आधीच सांगितले होते. मग प्रशांत नैताम आणि मी अवघ्या पाच मिनिटांत तिथे पोहचलो. ती मुले घाबरलेली दिसत होती. आम्ही त्यांना पोलीस असल्याचे प्रथमदर्शनी वाटले असावे. म्हणून आम्ही गाडीवरून खाली उतरताच दोन्ही मुले आमच्या पायावर डोके ठेवून आमची माफी मागू लागली. त्यांचे वय अंदाजे १५ ते १७ वर्षांच्या दरम्यान असावे. आम्हालाही कळत नव्हते की, ही मुले खरेच माफी मागत आहेत की केवळ इथून सुटका करून घेण्यासाठी नाटक करीत आहेत. परंतु आम्ही पोलीस विभागातील नाहीत याची त्यांना खात्री करून दिली. या प्रकरणी काय कारवाई करावी याबाबत तिथे जमलेल्या लोकांतील मतभेद पाहाण्यासारखे आहेत. काही म्हणत होते, यांची पोलिसांत तक्रार करावी, तर कोणी म्हणत होते, ही मुले कुठे कोणाला घ्या म्हणून जबरदस्ती

करीत आहेत? ज्यांना वाटेल ते घेतात; असे म्हणणाऱ्या काही लोकांना या मुलांचा हा धंदा वैध वाटत होता, त्यामुळे त्यांच्यावर पोलीस कारवाई करणे म्हणजे त्यांच्या पोटावर पाय देणे वाटत होते. उगीच तक्रार करून पोलिसांना लुटण्यासाठी संधी मिळेल असे काहींना वाटत होते.

आम्ही प्रत्येकाचे बोलणे निमूटपणे ऐकून घेत होतो. आम्हालाही मुलांना उगीचच खोळंबून ठेवून नाहक त्रास द्यायचा नव्हता. जसे या मुलांनी अशिक्षित, अज्ञानी व गरिबीमुळे गांजलेल्या लोकांची लुबाडणूक करू नये किंवा त्यांचे आर्थिक शोषण करू नये असे वाटत होते. त्याचप्रमाणे या मुलांची सुद्धा कोणाकडूनही पिळवणूक होऊ नये, असे मनोमन वाटत होते. आम्ही मुलांना आमचा परिचय दिला. घाबरू नका म्हणून दिलासा दिला आणि त्यांच्याजवळ असलेल्या कागदपत्रांवरून त्यांची सुद्धा पुरेपूर माहिती काढून घेतली. त्यांना कोणत्या प्रकारच्या रोगावरील इलाज करण्यासाठी मंत्र माहिती आहेत त्याविषयी खातरजमा करून घेतली. यापैकी त्यांना काहीही समजत नसल्याचे आढळले. मग त्यांना विचारले, ''हे असले धंदे का करता?'' यावर त्यांनी दिलेले महत्त्वाचे व मासलेवाईक उत्तर असे- ''सर, लोक घेतात म्हणून आम्ही विकतो; आम्ही कुणालाही जबरदस्ती करत नाही.''

त्यांना पुढचा प्रश्न केला की, ''कोणत्या वर्गातले लोक तुमचे हे साहित्य खरेदी करतात?'' तो म्हणाला, ''सरजी, कोई भी खरीदते है; चाहे वो अनपढ हो या पढे लिखे. जिनको इन चीजों का फायदा होता है, बाबूजी, वही लोग हमसे ये चीजे खरीदते हैं। हम तो जबरदस्ती करतेही नही है, साहब. बस हम तो केवल इससे क्या लाभ होता है इसी की जानकारी देते है, जो हमे मालूम है.''

''इस में आप क्या क्या चीजे बेचतो हो?'' तो एक एक वस्तू दाखवत म्हणाला, ''सरजी, ये नाल है, जो यही काले घोडे के पैर को खिलेसे पहले ठोकते है और बाद में निकालकर बेचते है. दूसरी चीज हात की उंगली में पहनने की अंगूठी, जिसपर भगवान शनी की प्रतिमा हैं और ताबीज जिस में हम घोडे की पूंछ के बाल और नाखून डालकर बेचते है.'' ''आप के परिवार के कितने लोग यह धंदा करते हैं?'' तर त्यावर म्हणाला, ''हमने तीन घोडे महाराष्ट्र में लाये है. और बहोत दिनों से यही काम करते हैं.'' मी मुलांना म्हणालो, ''इतने दिनों से आपको किसी ने रोका नहीं?'' तो म्हणाला, ''बाबूजी, नहीं.''

मी एका मुलासोबत संवाद साधत होतो तर प्रशांत नैताम हे दुसऱ्या मुलाकडून त्यांच्याजवळ असलेल्या वस्तूंची पाहाणी करून त्या वस्तू आपल्या हातात घेऊन जमलेल्या लोकांना दाखवीत होते. लोकांना अंधश्रद्धांविषयी माहिति देत सांगितले की, यातून लोकांना फायदा कवडीचा मिळत नाही. उलट लोकांना लुटणारा एक मोठा वर्ग समाजात आपोआप निर्माण होत जातो. निदान शिकलेल्या लोकांनी तरी अशा खुळचट कल्पनांना थारा देता कामा नये. आपल्यापैकी किती लोकांना अंधश्रद्धा निर्मूलन संबंधीच्या कायद्याची माहिती आहे असे विचारले असता हा कायदा काय आहे, कशासाठी आहे, 'याबाबत आम्हाला काहीही माहीत नाही' अशी उत्तरे मिळाली. मी 'जादूटोणा विरोधी कायदा- २०१३' असे थोडक्यात नाव सांगून एखाद्या व्यक्तीने अशा प्रकारची फसवणूक केल्यास सात वर्षांपर्यंत कारावास व पन्नास हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते, अशी माहिती दिली.

दोन्ही मुलांनासुद्धा याबाबत नीट समज देत सांगितले की, ''एक-दोन दिवसात ही बातमी वृत्तपत्रातून छापून येईल आणि तुमच्या घोड्यांची जागोजागी चर्चा सुरू राहील. त्यातच जर तुम्ही यापुढे अन्यत्र कुठेही लालसेपोटी अशी फसवणूक केली तर लोक पोलिसांत तक्रार देतील व या कायद्याखाली तुम्हाला तुरुंगवास आणि दंड अशा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात. त्यांच्या दुसऱ्या दोन घोडेवाल्यांना हे सारे त्यांनी कळवावे व त्या सर्वांनी महाराष्ट्राच्या बाहेर पडावे'', अशी सूचना केली. 'आमच्या युपीमध्ये असा कोणताही कायदा नाही आणि इथल्या कायद्याबद्दल कोणीही सांगितले नव्हते', असे त्या मुलांनी म्हटले. ''आम्ही यापुढे हे धंदे करणार नाहीत, आमच्या राज्यात निघून जाऊ, परंतु पोलिसांत तक्रार करू नका'', अशी गयावया ते वारंवार करीत राहिले. शेवटी त्या मुलांना आम्ही म्हटले, ''आम्हाला तुम्ही लेखी जबाब दिला तरच पोलिसांत त्यांची तक्रार दिली जाणार नाही.'' ते लिहून देण्यास तयार झाले. ज्या महिलेच्या जागरूकतेने ही सर्व प्रतिबंधक कारवाई सुरू झाली होती त्या महिलेनेच आपल्या नातीला वहीचा एक कोरा कागद आणण्यासाठी आवाज दिला. आणलेला कागद मी त्या मुलांच्या हातात देत त्यावर लिहून देण्यासाठी पेन दिला. तेव्हा एक मुलगा म्हणाला, ''बाबुजी, हम लोग ज्यादा पढे लिखे नही है. हमको लिखना नहीं आता. आपही लिखो. हम सिर्फ दस्तखत कर

देंगे.'' त्यानंतर त्या मुलांना धाक बसावा म्हणून काही ओळी लिहून त्याखाली त्यांच्या सह्या घेतल्या. यादरम्यान त्या मुलांच्या जेवणाची आम्ही विचारपूस केली.

वास्तविक भूत, भानामती, करणी, जादूटोणा, मंत्रतंत्र हे सारे थोतांड आहेत. मंत्रातंत्राने जर कोणी काही घडवून अथवा बिघडवून आणणार असतील तर अशा लोकांना आव्हान म्हणून महाराष्ट्र अंनिस तर्फे एकवीस लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. परंतु कित्येक वर्षांपासून हे आव्हान स्वीकारण्यासाठी कोणीही पुढे आलेले नाहीत. केवळ भीतीपोटी लोक अंधश्रद्धेला बळी पडतात. तेव्हा अशा लोकांपासून आपणच सावध राहिले पाहिजे, असे आवाहनसुद्धा महा. अंनिस, गडचिरोली जिल्हा शाखेच्या वतीने सर्व नागरिकांना केले. या प्रतिबंधक कारवाईत मी, माझे सहकारी महा. अंनिसचे गडचिरोली जिल्ह्याचे बुवाबाजी संघर्ष कार्यवाह श्री. प्रशांत नैताम व महा. अंनिसचे सदस्य तथा प्राणीमित्र श्री. अजय कुकडकर उपस्थित होते. नैताम यांनी त्या महिलेने दाखविलेल्या जागरूक आणि सुरू केलेल्या धाडसी हालचालींबद्दल तिचे अभिनंदन केले. असे भोंदूगिरी करणारे आपल्या अवतीभवती आढळून आल्यास 'महाराष्ट्र नरबळी व जादूटोणा प्रतिबंध कायदा २०१३' खाली कोणीही पीडित व्यक्ती पोलिसात तक्रार करू शकतो किंवा निदान लुबाडणूक, फसवणूक करणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करू शकतो. काही गुंतागुंतीच्या प्रकरणात अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे जनतेस आवाहन केले.

(लेखक वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे सहकार्यवाह आहेत.)

●

## विविध उपक्रमाच्या वाटेवर...

**सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह**

साप फक्त शेतकऱ्यांचाच नव्हे; तर पर्यावरण संतुलनाचे कार्य करणाऱ्या सर्व मानवजातीचा मित्र आहे, म्हणून सापांचे संरक्षण व्हावे, सापांविषयीच्या अंधश्रद्धाबाबत जागृती करण्यासाठी, सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह आयोजित केला जात आहे. या निमित्ताने सापांच्या पोस्टरचे प्रदर्शन भरवणे, सर्प-एक वैज्ञानिक दृष्टिकोन ही फिल्म दाखवणे व सर्पतज्ज्ञाचे व्याख्यान आयोजित करून सर्पाविषयी प्रबोधन करणे.

**महाराष्ट्र अंनिस स्थापना दिवस**

९ ऑगस्ट १९८९ रोजी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी पुण्यात संघटनेची स्थापना केली. आज महाराष्ट्रभर ३५०हून जास्त शाखा असलेल्या समितीने महाराष्ट्र शासनाला जादूटोणाविरोधी कायदा आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा हे दोन महत्त्वाचे कायदे करायला भाग पाडले. यानिमित्त संघटनेचे विचार, रचना, भूमिका याबाबतीत चर्चासत्र घेणे, चला महाअंनिसला जाणूया या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करणे व जादूटोणाविरोधी कायदा आणि सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा याबाबत तज्ज्ञांच्या व्याख्यानाचे आयोजन करणे.

**शहीद डॉ. दाभोलकर बलिदान दिन**

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन संपूर्ण भारतभर राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने शाळा, महाविद्यालय व सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिनानिमित्त व्याख्यान, चर्चासत्र किंवा परिसंवादाचे आयोजन करणे, स्थानिक प्रसारमाध्यमातून लेख लिहिणे, प्रतिक्रिया देणे व वैज्ञानिक दृष्टिकोनावर कार्यकर्त्यांची भाषणे आयोजित करणे, चळवळीची गीते, पथनाट्य याद्वारे सांस्कृतिक माध्यमाने प्रबोधन करणे.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १९९३ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्रात गणेशमूर्तींसाठी वापरलेले निर्माल्य जमा करण्याचे अभियान सुरू केले. राज्यभर या अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमाची दखल राज्यसरकारलाही घ्यावी लागली आणि आता जवळजवळ महानगरपालिका, नगरपालिकांमध्ये अंनिस आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून हे अभियान राबविले जात आहे. आजकाल प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा वापर करून उंच मूर्ती तयार करण्याची स्पर्धा लागलेली दिसते. अश्या मुर्तीमुळे पाण्यातील मासे व इतर जलचरांचा श्वास गुदमरतो. जिवंत पाण्याचे झरे कायमचे सिमेंट लावल्याप्रमाणे बंद होतात. मूर्तीसाठी वापरण्यात येणारे कृत्रिम रासायनिक रंग यामुळे पाण्याचे प्रदूषण होते. गणेशोत्सवात मातीच्या व नैसर्गिक रंगात रंगवलेल्या प्रतिमांची स्थापना करण्याचा आग्रह धरणे व थर्माकोलसारख्या पर्यावरणास हानीका-रक वस्तूंचा अनावश्यक वापर टाळणे. गुलाल व पर्यावरणपूरक रंगाचा वापर करण्यात यावा व पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करावा यासाठी प्रबोधन करणे.

●



# वर्तमानकाळ आणि समन्वयाचे सूत्र

डॉ. बाळू दुगडूमवार
९७६७१८९३९२

**(वर्तमान काळात विविध विध्वंसक अस्मितांनी आणि वर्चस्ववादी मनोवृत्तींनी सर्वत्र थैमान घातले आहे. परस्परांना कमी लेखण्याची आणि एकमेकांना पाण्यात पाहाण्याची वृत्ती वाढते आहे. यामुळे समाजमन विद्वेशाने कलुषित झाले आहे. या पार्श्वभूमीवर विविध पातळीवरच्या समन्वयाचा विचार मोठ्या प्रमाणावर प्रसारित करणे विवेकवाद्यांपुढे आव्हान म्हणून उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत विविध पातळ्यांवरची समन्वयात्मक मांडणी तरुण समीक्षक तथा विचारक डॉ. बाळू दुगडूमवार हे समन्वयाचे बांधकाम या सदरातून करीत आहेत.)**

वर्तमानकाळ हा एक प्रकारे टोकदार अस्मितांचा स्फोटक काळ आहे. स्वतःचे ते श्रेष्ठ आणि इतरांचे ते दुय्यम मानण्यात हा काळ धन्यता मानतो आहे. प्रत्येकाला आपल्या म्हणून वाटणाऱ्या ज्या ज्या बाबी आहेत त्याच महत्त्वाच्या वाटू लागल्या आहेत. ठीक आहे; असे स्वतःचे महत्त्वाचे वाटणे काही वावगे नसतेच, मात्र हे 'स्वतःचेच महत्त्वाचे वाटणे' इतरांच्या बाबींकडे अक्षम्य असे दुर्लक्ष करून दुसऱ्याचे कसे कमी महत्त्वाचे आहे हे दाखवण्यासाठी रेटारेटी करत आहे. परिणामी, वर्तमानकाळ हा एका अर्थाने तुकड्यांमध्ये आणि शकलांमध्ये विभाजित होत चालला आहे. कोणीही कोणाला समजूनच घ्यायचे नाही. कोणीही कोणाला मानसन्मान द्यायचाच नाही. कोणाचे सत्य असले तरी त्याचे ते सत्य मान्य करायचे नाही. असा अलिखित नियमच जणू या काळाने स्वतःवर आणि मानवांवर लागू केला आहे. अशी बेदरकार आणि इतरांना दुय्यमत्व देणारी (काही अपवाद वगळता) सर्वव्यापी मनोवृत्ती वरचेवर वाढत जाते आहे. हे आता कोणीतरी समजून घेणे आणि इतरांना सांगत राहाणे गरजेचे होऊन बसले आहे, असे मला वाटते.

स्वतःमध्ये रत झालेला, स्वतःवर आंधळे प्रेम करणारा, मी आणि माझे या आवर्तात धन्यता मानणारा हा समाजसमूह स्वतःच्या दोषांकडे डोळेझाक करत, स्वतःचे श्रेष्ठत्व मिरविण्यात रममाण झालेला दिसतो आहे. त्याला त्याची जात, धर्म, पंथ, भाषा, त्याचे धर्मग्रंथ, पुराणग्रंथ, त्याच्या जातीत जन्मलेला महापुरुष (तोही त्याने सांगितलेला विचार वगळून), त्याच्या प्रथा, परंपरा, रूढी, रिवाज, तथाकथित संस्कृती, श्रद्धा, कर्मकांड, देव-देवता या गोष्टी अधिक आवडायला लागल्या आहेत. तशा या गोष्टी सामान्यतः साहाजिकपणे आवडणे याबद्दल कोणालाही तक्रार असण्याचे कारण नाही; पण त्या इतक्या आंधळेपणाने आवडायला लागल्या आहेत की, त्यात असलेले किंवा नव्याने निर्माण होणारे दोष पाहून आणि समजूनही त्याकडे डोळेझाक करण्याइतका तो नासमज बनत चालला आहे. त्याच्या वास्तवाचे आणि विवेकाचे भानच हरवत चालले आहे. त्याचबरोबर या साऱ्यात त्याच्या बेगडी आणि विध्वंसक तकलादू अस्मिता उग्र रूप घेऊन पुढे येत आहेत.

अशा उग्र आणि विध्वंसक अस्मितांचे नशापान करून झिंगणारे हे समाजसमूह आता श्रेष्ठत्वाचे शक्तिप्रदर्शन करण्यासाठी चवताळून एकमेकांसमोर चालून येत आहेत. त्यांच्यात सर्वच पातळ्यांवरचा संघर्ष चेततो आहे. असे समाजसमूह एकमेकांवर सातत्याने या ना त्या प्रसंगी आपले श्रेष्ठत्व जगजाहीर करून इतरांवर वचक निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या साऱ्यातून एक नवे, भयंकर आणि मानवी सभ्यतांची मुळं उखडून टाकणारे अराजक जगासमोर येऊन ठेपले आहे.

धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, अध्यात्म, तत्त्वज्ञान, भौतिक जीवन, विज्ञान-तंत्रज्ञान आणि नैतिकता या साऱ्या क्षेत्रांमध्येही ही स्वश्रेष्ठत्वाची आणि दुसऱ्याला दुय्यम मानण्याची वृत्ती वाढून स्थिरावत जाऊन प्रतिष्ठा प्राप्त करत आहे. ही अधिक चिंतेची बाब आहे. अशा वर्तमानकाळात मानवी समूहाचे एक प्रकारचे प्रतिष्ठित, संपन्न रानटीकरण तर होणार नाही ना, अशी भीती माझ्यासारख्या मानवाला सतावते आहे. ही भीती

मला या साऱ्याबद्दल समविचारींशी बोलायला, यातून काही मार्ग शोधायला उद्युक्त करते आहे.

स्वतःमध्ये रत झालेल्या समाजसमूहांच्या या गदारोळात विवेक आणि मानवीय समत्वाचा विचार करू पाहाणाऱ्यांची मोठी कोंडी होते आहे. त्यांना या समाजसमूहात सामीलही व्हावेसे वाटत नाही आणि त्या समूहांना प्रतिरोधही करता येत नाही, अशा एका वेगळ्याच पेचात आज माझ्यासारखी माणसं आहेत. पण म्हणून आपण केवळ निष्क्रियपणे बसून राहावे का? तर नाही. या साऱ्या गदारोळातही एक सर्वसमावेशी आणि सर्वहितैषी समन्वयाचे सूत्र शोधून ते लोकांपुढे मांडत राहाणे; भलेही वर्तमानकाळ कितीही स्वश्रेष्ठत्वाच्या नशेत झिंगलेला असला तरी आपण समन्वयाच्या सूत्राचा जोरकसपणे स्वीकार करणे, ते समन्वयाचे सूत्र लोकांपुढे मांडत राहाणे, मला महत्त्वाचे वाटते.

'समन्वय' हे एक असे सूत्र आहे की, जे झिंग चढून विध्वंसक होत जाणाऱ्या वर्तमानकाळाला निरामयता देऊ शकते. माझे तेच श्रेष्ठ म्हणताना इतरांचेही श्रेष्ठ असू शकते, तुम्हा दोघांमध्येही काही एक साम्य असू शकते तेव्हा या साम्याचा विचार करून त्याचा सन्मानाने स्वीकार केला पाहिजे, याचे भान या वर्तमानातील लोकांपुढे उभे करता येऊ शकते, यावर माझा विश्वास आहे.

जात, धर्म, भाषा, लिंग, विचारधारा, महापुरुष, संतमहात्मे, मतमतांतरे, संप्रदाय, लैंगिकता, विज्ञान-तंत्रज्ञान, संस्कृती, परंपरा, डावे-उजवे, शिक्षण-संस्कार, पुराणे- वर्तमानकाळ, सहिष्णूता यांसारख्या संवेदनशील, नाजूक मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या गोष्टींमध्ये समन्वयाचा सेतू बांधणे मला गरजेचे वाटते. कोणतीही एकच बाजू, कोणताही एकच दृष्टिकोन, कोणताही एकच महापुरुष, कोणताही एकच धर्म, कोणतीही एकच विचारधारा मानवी जीवनाला, मानवी सभ्यतेला आणि मानवीयत्वाला पूर्णत्व देऊ शकेल किंवा कोणत्याही एकाच बाजूमुळे मानवी जीवन निरामय होऊ शकेल, याबद्दल साशंकता आहे. त्यामुळे या साऱ्यामध्ये एक सर्वसमावेशी असा समन्वय असणे आवश्यक वाटते. समन्वयाच्या सेतूवरूनच मानवाचा जीवनप्रवास सुखेनैव होऊ शकतो आणि दुसऱ्यालाही हा जीवनप्रवास करण्यासाठी तो सहाय्यभूत ठरू शकतो, यावर माझा विश्वास आहे. समन्वय हे मानवसमाजाला समन्यायी, सर्वहितैषी स्थैर्य देऊ शकणारे सूत्र आहे असे मला वाटते.

प्रत्येकाला हा वर्तमानकाळ एका गटात लोटून मोकळा होतो आहे आणि एकदा का माणूस एका गटात सामील झाला रे झाला की, त्याच्याभोवती हे स्वश्रेष्ठतेचे, बेगडी अस्मितांचे आवरण चढत जाते आहे. त्याची सर्वसमावेशी समन्वय भावनाच आकुंचित होत जाते आहे. उदा. मी हिंदू आहे तर मी हिंदूंचेच समर्थन केले पाहिजे आणि इतर धर्मावर शरसंधान केले पाहिजे. हिंदू आणि तत्संबंधित गोष्टींचे श्रेष्ठत्व जगासमोर मांडत राहिले पाहिजे आणि हे मांडतानाच इतर धर्मासंबंधित गोष्टींचे कनिष्ठत्वही दाखवत राहिले पाहिजे, असेच आपल्यावर बिंबवले जात आहे. कमीअधिक प्रमाणात सर्वच धर्मियांमध्ये असेच काहींसे घडते आहे. यामुळे व्यक्ती एका बेगडी आणि विध्वंसक अशा अस्मितेच्या वर्तुळांमध्ये अडकून पडत आहे. पण हे योग्य नाही. स्वतःचा धर्म श्रेष्ठ आहे हे स्वीकारताना इतरांचा धर्मही श्रेष्ठ असू शकतो हे आपण मान्य करायला हवे. आपल्या धर्मात जे काही वाईट आहे ते सोडून देण्याची, इतर धर्मात जे काही चांगले आहे ते स्वीकारण्याची समन्वयाची भावना मानवी समाजाच्या निकोपतेसाठी महत्त्वाचीच आहे. नाही का? म्हणून समन्वयाचे सूत्र हे वर्तमानकाळाला निरामय बनवण्यासाठी उपयुक्त आहे. समन्वयामुळे सर्वसमावेशकता आणि वैश्विकताही वाढू लागते आणि यातूनच बेगडी, विध्वंसक अस्मितांची वर्तुळं मोडली जाऊ शकतात, यावर माझा विश्वास आहे.

मला हेही चांगलेच माहीत आहे की, हे समन्वयाचे सूत्र समाजमनात रुजवणे फार कठीण आहे. कारण नकळतपणे या अस्मितांमध्ये अडकून पडलेल्यांना समजावले तर ते पटकन समन्वय समजून घेतील, स्वीकारतीलही पण जिथे मुद्दामहून अशा अस्मितांची वर्तुळं स्वतःभोवती आखून घेऊन मिरवली जात आहेत. अशांच्या गळी समन्वयाचे सूत्र उतरवणे खूपच कठीण आहे. पण असे असले तरी अशक्य काहीच नसते, म्हणून आपण आपल्या परीने सर्व पातळ्यांवर समन्वयाची भूमिका मांडत राहिली पाहिजे, हेच महत्त्वाचे!

एक विचार करणारा माणूस आणि लेखक म्हणून या संबंधात मी काय करू शकतो? याचे उत्तर तसे गुंतागुंतीचे असले तरी ते तितकेच सोपेही आहे, असे मला वाटते. मी एक लेखक म्हणून एका सर्वसमावेशक समन्वयाचे

शब्दांच्या माध्यमातून बांधकाम करू शकतो. हे बांधकाम मानवाच्या सद्विवेकी बुद्धीला नक्कीच साद घालणारे असेल. आपल्याकडे आपापल्या विचारधारांचे आणि मतमतांतराचे जोरकसपणे समर्थन करणाऱ्या आणि भूमिका मांडणाऱ्या सुट्या सुट्या अशा लेखन परंपरा मोठ्या प्रमाणात आहेत. पण सर्वसमावेशी अशी समन्वयाची मांडणी (काही अपवाद वगळता) फारच कमी प्रमाणात झाल्याची आपल्याला जाणवते. जुन्या काळातले आचार्य जावडेकर असतील किंवा वर्तमानातील डॉ. श्रीपाल सबनीस यांच्यासारखी काही मंडळी या दिशेने मांडणी करताना दिसते आहे.

मला असे वाटते की, एक सुटा विचार कितीही सामर्थ्यवान आणि महत्त्वाचा असला तरी तो सकल मानवाच्या हिताचा कधीच सिद्ध होऊ शकत नाही. याचा अर्थ त्या विचाराला मूल्य नसते असे नव्हे. परंतु मानवाचे हित हे समन्वयातूनच अधिक सहजपणे साधता येऊ शकते. त्याच्यात वैश्विक उदारता आणि सकलत्वाची भावना वाढवता येऊ शकते. एक सुटा विचार तो जरी महत्त्वाचा वाटत असला तरी तो सामान्य माणसाला वैश्विक भान देऊ शकेल याची खात्री मला तरी वाटत नाही. सामान्य माणूस असा विचार पटकन स्वीकारत असला तरी तो त्याच वेगाने त्या विचारांचे अस्मितेमध्ये रूपांतर करून घेतो आणि त्यातच अडकून राहाण्यात तो धन्यता मानू लागतो. म्हणून त्याच्यापुढे अस्मितारहित, सर्वसमावेशी समन्वयाचा विचार ठेवणे अधिक महत्त्वाचे ठरते.

वर्तमानकाळ हा वर चर्चिल्याप्रमाणे ताठर अस्मितांना स्वीकारणारा काळ आहे. त्यामुळे समन्वयाची नितांत गरजही आज निर्माण झाली आहे. भलेही हे समन्वयाचे सूत्र लवकर स्वीकारले जाणार नाही पण ते समजून घेण्याची, मांडण्याची आणि इतरांना समजावण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे, असे मला वाटते. म्हणून मला न झेपणारे पण माझ्या मानवीयत्वाची गरज म्हणून स्वीकारलेले हे समन्वयाचे बांधकाम मी करू पाहातो आहे. हे बांधकाम कुठल्याही सैद्धांतिक पातळीवरचे नसून ते वर्तमानाच्या निरीक्षणातून आणि माझ्या व्यक्तिगत चिंतनातून साकारणार आहे. त्यामुळे हे बांधकाम चिरेबंदी स्वरूपाचे नसून ते दगडामातीच्या उन्मुक्त समन्वयाच्या ओलाव्यातून होणार आहे, हे मला इथे मुद्दाम नोंदवावेसे वाटते.

(लेखक अं.नि.प. या मासिकाचे संपादक मंडळातील सदस्य आहेत )

•

## बकरी ईदनिमित्त रक्तदान शिबिर



**पनवेल** : महाअंनिस पनवेल शाखा, सर्वोदय, हुसेनी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या सहकार्याने दि.९ जुलै २०२२ रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात तीस जणांनी रक्तदान केले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन 'मानवता जपा' आणि 'हीच आमुची प्रार्थना, हेच आमचे मागणे' या गाण्यांनी झाली. महाराष्ट्र अंनिसच्या सुशीला मुंडे, राष्ट्रसेवा दलाचे अल्लाउद्दिन शेख, पत्रकार व संपादक किरण बाथम, रोटरी क्लब आणि पनवेल येथील शेलार हॉस्पिटलचे डॉ.शेलार यावेळी उपस्थित होते. यावेळी अल्लाउद्दिन शेख यांनी बकरी ईद साजरी करताना रक्तदान करून आपण बंधुभाव, प्रेम, आपुलकी जपण्याचे काम केलेले आहे असे सांगीतले. रक्तदानासोबत येणाऱ्या प्रत्येकाने मोफत आरोग्य तपासणी केली.



# अंधश्रद्धा आणि विषमता यांचे बदलते संदर्भ

डॉ. माधुरी झाडे
९४२३४२०२६३

भारतीय समाजव्यवस्था ही विषमतेवर आधारित असणारी समाजव्यवस्था आहे. या संदर्भात आपण सर्व परिचित आहोतच. विषमता ही लिंगाधिष्ठित, जातीधिष्ठित, धर्माधिष्ठिततसेच आर्थिकतेवर आधारित असलेली दिसून येते. याच सोबत पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्री-पुरुषांमधील विषमता ही अंधश्रद्धांमुळे देखील समाजव्यवस्थेमध्ये आपले पाय वर्षानुवर्ष घट्ट रोवून बसलेली आहे, असेही दिसून येते. समाजमनात असलेल्या शिक्षित, अशिक्षित, स्वतःला सुशिक्षित, शहाणं, हुशार अशी विविध विशेषण असणाऱ्या नव्हे तर ती लावून घेणाऱ्या समाज घटकांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आहेत. या अंधश्रद्धामुळे महिलांवर वर्षानुवर्षे काही गोष्टी समाजव्यवस्थेने लादल्या आहेत तर काही वेळेस आपलं जीवन सुकर व्हावं, चाकोरीबद्ध व्हावं तसेच व्यवस्थेने आपल्याला नाकारू नये याकरिता महिला स्वतःहून काही गोष्टी स्वतःवर लादून घेतात. समाजमनाची इतक्या मोठ्या प्रमाणात असलेली धार्मिक नियंत्रणेही अंधश्रद्धांना खतपाणी घालणारी आहेत. यातूनच स्त्रीच्या वाट्याला सातत्याने दुय्यमत्व येऊन विषम वागणूक तिच्या वाट्याला आलेली आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीमध्ये काम करीत असताना अनेक घटना अगदी जवळून बघावयास मिळाल्या. यासोबतच या विषयावरील वाचन, चिंतन, मनन, विविध कार्यक्रमयातून एक प्रामुख्याने लक्षात आले की, अंधश्रद्धा ही मुळातच शोषणाची व्यवस्था आहे. तसेचती विषमतेवर देखील आधारलेली आहे. भारतीय संस्कृतीचा विचार करीत असताना आढळून येते की, सामान्यपणे आम्ही आपल्या संस्कृतीचे खूप गोडवे गात असतो. याचे प्रमुख कारण धर्मव्यवस्थेत दडलेले आहे. आमच्या संस्कृतीने स्त्रीला देवीचे स्थान बहाल केले. आमच्या देशाला मातेचे स्थान बहाल केले. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी', अशा स्वरूपाच्या म्हणी तयार करून तिचा गौरव केला आहे. परंतु, प्रत्यक्षात तिच्या वाट्याला अनेक दुःखे आणि यातना आल्या आहेत. या दुःख आणि यातनेचे ती जेव्हा जेव्हा परीक्षण करावयास पुढे येते, तेव्हा मात्र तिला खूप मोठ्या प्रमाणात कुटुंबातूनच विरोधाला सामोरे जावे लागते. कारण, अजूनही आपली समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. त्यामुळे या व्यवस्थेने स्त्रियांवर असंख्य बंधने लादून तिच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण केले आहेत. आज समाजामध्ये बोलले जाते की, आता महिला कुठे मागे राहिल्या, प्रत्येक क्षेत्रात तिने प्रगती केली आहे. परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या वगुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवणाऱ्यात मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे जरी खरे असले तरी गावातील, आदिवासी वस्त्यांमधील, वाड्यांमधील, जत्रायात्रांमध्ये अंगात येणाऱ्या, भुताने झपाटलेल्या, देवी अंगात संचारणाऱ्या महिलांची संख्यादेखील दिवसागणिक कमी होण्याऐवजी वाढतच आहे. तसेच आपल्या आधुनिक समाजात हुंड्याकरिता महिलांचा छळ होणे, या नैराश्यातून तिचे मानसिक खच्चीकरण होणे, जाळले जाणे या घटना नित्याच्याच झाल्या आहेत.

शुभ-अशुभ तसेच पवित्र -अपवित्र या संकल्पना स्त्री पुरुष विषमतेला, अंधश्रद्धेला फार मोठ्या प्रमाणात खतपाणी घालतात. शुभ-अशुभ या संकल्पनेचा स्त्रियांच्या शारीरिक व कौटुंबिक घटनांवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. शुभ-अशुभ या समजातून महिलांची फार मोठी वर्गवारी केली जाते. याच महिलांना अनेक संधी नाकारल्या जातात. प्रसंगी एखाद्या व्यक्तीचं जगणं असह्य होऊन जातं. याचं कारण म्हणजे केवळ ती व्यक्ती अपशकुनी आहे, असा समज होय. घरात पाय ठेवताच घरामध्ये वाईट घटना घडायला सुरुवात झाली, घराची शांतता भंग झाली की, अशा प्रकारचे अनेक आरोप तिच्यावर करण्यात येतात.

पूर्वी राजे-महाराजे घराबाहेर पडताना त्यांच्या-समोरून जाणीवपूर्वक सुवासिनींना पाठविले जायचे, कारण या राजा-महाराजांना शुभशकुन घडावा असा त्यामागील उद्देश होता. परंतु, आजही सुवासिनी आणि विधवा

यामधील शुभ-अशुभ संकल्पना कार्यरत असलेली दिसते. ही संकल्पना प्रामुख्याने अंधश्रद्धेवर आधारलेली आहे. उदाहरणार्थ, एखाद्या स्त्रीच्या नवऱ्याचा मृत्यू झाला, तर तिला अनेक धार्मिक व कौटुंबिक कार्यक्रमांना जाण्यास बंदी असते. उदाहरणार्थ, हळदी कुंकवाचा कार्यक्रम, नामकरण सोहळा. स्त्रीला जोडीदार असणं-नसणं हे सर्व तिच्या पवित्र्य-अपवित्र्यावर व शुभ-अशुभतेवर अवलंबून आहे. हे जसे स्त्रीच्या बाबत आहेतसेच ते पुरुषाच्याबाबत देखील असावयास पाहिजे. परंतु, इथेदेखील लिंगभेदाचे तत्त्व काम करीत असताना दिसून येते.

स्त्रियांच्या संदर्भात 'अखंड सौभाग्यवती' हा आशीर्वाद आहे की, तो भविष्यातील दिशादर्शक आहे, असा प्रश्न पडतो. याचा अर्थ असा की, तिने मरेपर्यंत सौभाग्यवती राहावं. म्हणजेच आधी तिचा मृत्यू व्हावा. यामध्ये नवऱ्याच्या दीर्घायुष्याची अपेक्षा असेल, पण तिचं काय? 'अखंड सौभाग्यवती'असा आशीर्वाद स्त्रियांना फार छान वाटतो. परंतु, त्यांनी याचा अर्थ नीट समजून घेतला, तर त्यातील लबाडी लक्षात येते. तिचं सौभाग्य हे सर्वोत्तम आहे. अगदी तिच्या प्राणापलीकडे! सौभाग्य या शब्दाची फोड वेगळी असली तरी हे सौभाग्य म्हणजे पती असंच समजण्यात येते. म्हणजे, हे सर्व त्याच्या दीर्घायुष्यासाठी करायचं असतं. त्यात तिचा विचार कुठेच दिसत नाही.

लिंगभाव विषमतेच्या अनेक परिणामांपैकी माणसांना नाकारणं,हा एक परिणाम आहे. यामधून महिला समुदायातील व्यक्तींना लिंगाच्या आधारावर दुय्यमत्व प्रदान करायचं, त्यांना काही विशिष्ट भूमिका देऊन त्यांचे आयुष्य बंदिस्त करायचं. त्यांच्या चारित्र्यावर संशय निर्माण करायचे, त्यांची बदनामी करायची; अथवा शुभ-अशुभ, पवित्र-अपवित्र या संकल्पनांच्या माध्यमातून त्यांच्यावर नियंत्रण मिळवायचे व यामधून त्यांचे शोषण करायचे, त्यांच्यावर मालकी प्रस्थापित करायची. हे सर्व अंधश्रद्धेतून घडत असते. त्याकरिता पुरुषसत्ताक व्यवस्था कार्य करीत असते व विषमतेचे बीज सातत्याने पेरत असते. अनेक व्रतवैकल्ये, उपासतापासही स्त्रीच्या वाट्याला आले आहेत. अनेक स्त्रिया उपवास करीत असताना 'एक दिवस पोटाला आराम मिळावा म्हणून उपवास करतो', असे सांगतात. त्यामुळे तब्येत ठणठणीत राहते, असेही कारण सांगत असतात. खरंच हे सत्य आहे? यामध्ये वैज्ञानिक कारण असतं, तर डॉक्टरांनी पुरुषांना देखील आठवड्यातून एक दिवस उपवास करायचे सांगितले असते. परंतु, प्रत्यक्षात असे आपणास दिसून येत नाही. यावरून उपवास हे स्त्रियांच्या शोषणाचे एक भयंकर षडयंत्र आहे, असे लक्षात येते. यामधून स्त्रीच्या आरोग्याचे असंख्य प्रश्न निर्माण होतात आणि त्यामधून अंधश्रद्धांना मोठ्या प्रमाणात खतपाणी मिळते. यामधून उपासना, आराधना, उपवास यांचा जन्म होतो. व्रतवैकल्य करीत असताना सातत्याने एक युक्तिवाद केला जातो तो असा की, या निमित्ताने स्त्रियांना नटायला, घराबाहेर पडायला मिळते. त्या काही वेळेला नटण्यासाठी दिवसभराचं शोषण सहन करतात आणि करायचं काय, तर वडाच्या झाडाला फेऱ्या मारा, होळीची पूजा करा, वाण घ्यायला फिरा इत्यादी. हेही का करावं याकरिता विज्ञान असतंच! वडाच्या झाडाची ऑक्सिजन थिअरी, अनवाणी चालण्यातील ॲक्युप्रेशर, तुळशीची पूजा आणि शुद्ध ऑक्सिजन अशा प्रकारचे प्रतिवाद ऐकायला मिळतात. आणि हो, हे जर खरंच आहे, तर मग हे फक्त स्त्रियांसाठीच का?पुरुषांसाठीसुद्धा याची गरज असायला हवी. परंतु असे दिसून येत नाही. यावरून विषमतावादी अंधश्रद्धा या बहुसंख्येने स्त्रियांच्याच वाट्याला आलेल्या दिसून येतात व त्यांची रचना अगदी समर्थपणे, समर्पकपणे मांडलेली दिसून येते.

काही वेळेला असाही युक्तिवाद केला जातो की, ही व्रतवैकल्ये स्त्रियांनाच करायला आवडतात. काही प्रमाणात हे खरंही आहे. परंतु, सर्वसामान्यपणे आपण वरील विधान खरे आहे, असे मानू शकत नाही. कारण, महिलांवर हजारो वर्षांचा या संदर्भातील पगडा असतो. काही स्त्रियांना हे सगळं करण्याची आवड असते आणि काहींवर परंपरांच्या नावाखाली सक्ती केली जाते. याचा अर्थ, त्यांच्यावर प्रत्यक्ष सक्तीच केली जाते, असे नाही; परंतु त्या अप्रत्यक्षरीत्या त्या सक्तीच्या दडपणाखाली सातत्याने असतात किंवा त्यांनी ती सक्ती स्वतःवर लादून घेतलेली असते. कारण, बहुतेक व्रते, उपवास नवऱ्यासाठी, मुलं होण्यासाठी किंवा मुलांचे चांगले होण्यासाठी केले जातात. जर हे केले नाही तर कुटुंबावर प्रेम नाही, नवरा व मुलांवर प्रेम नाही, असे अर्थ काढले जातात आणि म्हणूनच कुटुंबावर प्रेम, नवऱ्यावर प्रेम, मुलांवरचं प्रेम सिद्ध करायचं तर परत उपास करायलाच हवां, असं तिला सातत्याने वाटते. तिच्या प्रेमाच्या भावनांवर शंका उपस्थित केलेली तिला परवडणारी नसते. म्हणून लोकांच्या अविश्वासात

राहण्यापेक्षा ही व्रतवैकल्ये, उपवास केलेले काय वाईट आहे, असे तिला वाटते व त्यामुळे सर्व अंधश्रद्धांना ती स्वीकारत जाते. याउलट विचार करीत असताना पुरुषांनी मात्र मुलाचे, बायकोचे चांगले व्हावे याकरिता कुठल्याही स्वरूपाचे व्रतवैकल्य केल्याचे दिसून येत नाही. (अपवाद वगळता) म्हणजे कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी स्त्रियांवर सोपवून पुरुष मात्र मोकळा झालेला दिसून येतो. या सर्व अंधश्रद्धांमधून लिंगभाव विषमता दिसून येते.

आपण जेव्हा परंपरेने चालत आलेल्या व्रतवैकल्यांच्या आख्यायिकांचा विचार केला, तर आपणास असे दिसून येईल की, व्रतवैकल्ये स्त्रीला समर्पणाची भावना शिकवितात. स्त्रीने स्वतःपेक्षा कुटुंबाच्या सुखाचा अधिक विचार करायचा, विशेषत: पतीचा, हे या आख्यायिकांमधून बिंबविले जाते. तिचा त्याग, यातना,उपवास व काही उपासना हाच जणू पुरुषांच्या व कुटुंबीयांच्या सुखाचा, त्यांच्या आरोग्याचा व प्रगतीचा मार्ग आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारची वैज्ञानिकता दिसून येत नाही. तर, सरळसरळ यामध्ये लिंगाधिष्ठित विषमतावादी अंधश्रद्धा दिसून येतात. पितृसत्तेचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी सत्यवानाच्या सावित्रीच्या काय मागण्या होत्या? एक नवऱ्याचे राज्य, दोन-सासऱ्याची दृष्टी आणि तीन १०० पुत्ररत्नं (मुलगी नाही). याचा विचार केला, तर तिथं तिचं स्वतःचं अस्तित्व कुठेच दिसत नाही. एवढेच नाही, तर स्त्री वर्गाचं अस्तित्व दिसत नाही. १०० पुत्ररत्नं मागणारी स्त्री ही संपूर्ण महिला वर्गाकरिता खरंच आदर्श असू शकते का? तरीदेखील तिला आदर्श म्हणून इतर स्त्रियांसमोर ठेवले जाते. दुसरीकडे आपणास दुसरी सावित्री दिसून येते. तिने असली परंपरावादी अंधश्रद्धेवर आधारलेली व्रतवैकल्ये झुगारून स्त्रीशिक्षणाचा गाडा ओढला. तिच्याही वाट्याला असंख्य अवहेलना आल्या. तिला मूल होत नाही म्हणून ज्योतिबाने दुसरे लग्न करावे, असा सल्ला अनेकांनी ज्योतिबांना दिला. त्यानंतर ज्योतिबांनी दिलेले उत्तर हे खरंच कृतिशील स्त्री-पुरुष समतेचे प्रतीक आहे. त्यांनी सांगितले, 'सावित्रीला मुलं होत नाहीत, याबद्दल दोष तिचा असेल? मुलं होत नाही तर दोष माझ्यातही असू शकतो आणि तसे असल्यास तिने दुसरे लग्न केलेले आपणास चालेल का?' असे ठामपणे पूर्वी उत्तर देणारे एकच फुले असू शकतात. अन्यथा आजही वास्तव हेच आहे की, विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी मुलगा झाला नाही, तर त्याचे खापर स्त्रियांवर फोडले जाते. त्याकरता तिला अवैज्ञानिक, अंधश्रद्धेवर आधारलेले व्रत, उपवास करावे लागतात.

आज विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की, मुलगा होण्याकरिता लागणारे गुणसूत्र निसर्गाने पुरुषांकडे दिलेले आहे; परंतु त्याकरिता जबाबदार धरणार ते स्त्रीला.विज्ञानाचे वास्तव समजूनही यामध्ये अजून पाहिजे त्या प्रमाणात बदल झालेला दिसून येत नाही. मुलगा होण्याकरिता भलेही मग गोपाल संतान विधी, पुत्रकामेष्टी यज्ञ, बुवाबाबांचे आशीर्वाद इत्यादी अंधश्रद्धेवर आधारलेली दमछाक करणारी व्रतवैकल्ये करीत असतात. खरे तर स्त्रीबीज व पुरुषबीज यांच्या संयोगातून पेशी निर्माण होतात. त्याचक्षणी लिंग निश्चित होते. परंतु, तरीही तिसऱ्या किंवा चौथ्या महिन्यात 'गोपाल संतान विधी' करून हमखास मुलगाच देणाऱ्या आधुनिक बाबांकडे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते.

अंधश्रद्धांमुळे मोठ्या प्रमाणात समाजामध्ये स्त्रियांना मिळालेले दुय्यमत्व, विषमतापूर्ण वागणूक यामध्ये सुधारणा करायची असेल आणि खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित करायची असेल, तर समाजामध्ये असलेल्या या सर्व अंधश्रद्धांना ओळखून त्या दूर करण्यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांनी एकत्र येऊन सातत्याने चिकाटीने प्रयत्न करावयास हवा. सत्य-असत्य ओळखून सत्याच्या पाठी ठामपणे उभे राहायला शिकले पाहिजे. पालक, शिक्षक यांनी विवेकी भूमिका ठेवून वैज्ञानिक दृष्टिकोन आचारात आणावयास हवा. स्वतःमध्ये तो रुजवायला हवा. त्याचा प्रचार-प्रसार इतरांपर्यंत करून विज्ञानाच्या करणीसोबत विज्ञानाची विचारसरणीदेखील जनमानसात रुजवायला हवी,ज्याप्रमाणे आपण विज्ञानाची सृष्टी घेतली, त्याचप्रमाणे विज्ञानाची दृष्टीदेखील विकसित करावयास हवी. समाजामध्ये विवेक वाढीस लागला, तर येणाऱ्या भावी पिढीमध्ये अंधश्रद्धांवर आधारित लिंगनिहाय विषमता दूर होईल. याकरिता सातत्याने प्रयत्न करून नवा विवेकी समाज घडविता येईल. गरज आहे ती दृष्टिकोनात बदल करण्याची. शिक्षणाचा उपयोग वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्याकरिता केल्यास सुदृढ मानसिकता विकसित होऊन विवेकी समाजाची निर्मिती होईल.

(लेखिका महा. अंनिसच्या जिल्हा कार्याध्यक्षा आहेत.)

('अक्षरगाथा', जाने-मार्च २०२२, मधून साभार)



# कल्चरली करेक्ट

प्रा. डॉ. विजया पवार
९३७०७०१४६०

भारताचा देदीप्यमान वैचारिक वारसा म्हणजे बुद्ध! स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती व विज्ञाननिष्ठा ही आधुनिक काळात सर्वमान्य झालेली मूल्ये प्राचीन काळात ज्या महामानवाने जगाला सांगितली ते महाकारुणिक गौतम बुद्ध! हा समृद्ध वारसा समस्त भारतीयांचा आहे. परंतु सगळ्या भारतीयांना तो आपला वाटत नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला 'बुद्ध आणि त्याचा धम्म' यांचा नव्याने परिचय करून दिला आणि 'मुक्ती कोण पथे?' म्हणत बुद्धाच्या दिशेने जाण्याचा मार्ग निवडला. त्यांच्या सोबत त्यांचे अनुयायीही बुद्धाकडे गेले. नंतरच्या काळात हळूहळू समाजाच्या अन्य स्तरातील लोक जागे झाले आणि बुद्धाला डोळसपणे जाणून घेऊ लागले. पुढे शिक्षणाने आत्मसन्मान प्राप्त झालेल्या विचारी स्त्रियाही बुद्धांचा विचार डोळसपणे स्वीकारू लागल्या. बुद्ध हा आपला वैचारिक वारसा आहे, या जाणिवेने त्या दिशेने वाटचाल करू लागल्या. अशा निवडक ३३ महिलांचा धर्म चिकित्सेचा आणि बुद्ध स्वीकाराचा प्रवास सांगणारे महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'कल्चरली करेक्ट' होय. हे पुस्तक संदीप सारंग व डॉ. वंदना महाजन यांनी संपादित केले आहे. तर ग्रंथालीने प्रकाशित केले आहे.

ब्राह्मण, मराठा, कुणबी, माळी, पानमाळी, भावसार, गुरव, सोनार, येत्तम, राजपूत, आगरी, रामोशी, चर्मकार, मातंग, ख्रिश्चन अशा विविध जातिधर्मातील ३३ स्त्रियांचे हे अनुभवकथन आहे. पारंपरिक हिंदू कर्मठ संस्कारातून वाढलेल्या परंतु जीवनातील अनुभवाने आणि शिक्षणाने नवी दृष्टी मिळालेल्या या स्त्रिया हळूहळू बुद्ध विचाराच्या दिशेने प्रवास करू लागल्या. बुद्धांचा विचार हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा, मानवतेचा विचार आहे, याची अनुभूती घेऊ लागल्या. त्याची ही कहाणी आहे. या सर्व स्त्रिया आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या आहेत. शिक्षिका, प्राध्यापक, डॉक्टर, वकील, सामाजिक कार्यकर्ती, लेखिका अशा विविध क्षेत्रात नावलौकिक असणाऱ्या महिलांचे हे स्वतःचे परिवर्तन आहे. स्वतःला 'कल्चरली करेक्ट' करून घेणे आहे. या सर्वांनी बौद्धधम्म स्वीकारलेला आहे असे नव्हे, पण बुद्धविचार मात्र मनापासून स्वीकारला आहे.

स्त्रियांनी स्वीकारलेला बुद्धविचार आणि त्या वैचारिक प्रकाशात स्त्रीमुक्तीच्या दिशेने होणारा त्यांचा प्रवास अधोरेखित करणारा हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. तसेच सांस्कृतिक परिवर्तनाच्या दिशेने होणारी एक समृद्ध वाटचाल अधोरेखित करणारा ग्रंथ म्हणूनही या पुस्तकाचे महत्त्व जाणवते.

धर्मात स्त्रिया दुय्यम, असे मानणारा वर्ग समाजात मोठ्या संख्येने दिसतो. असा विचार करणाऱ्या मध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही आहेतच. खरे तर धर्म समाजाची धारणा करीत असतो. भारतीय समाजात प्राचीन काळापासून धार्मिक आणि सामाजिक जीवनाच्या व्यवच्छेदक सीमारेषा कधीच स्पष्टपणे समोर आलेल्या नाहीत. ह्या दोन्ही गोष्टी परस्परात इतक्या मिसळून गेल्या आहेत की, त्यांना वेगळे पाहणे अशक्य आहे. भारतीय समाजातील प्रत्येक सामाजिक समस्येचा संबंध कुठेतरी धर्माशी असलेला दिसतो. ज्यांना ज्यांना सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करावयाचा असेल किंवा सामाजिक विषमता, साचेबंदपणा यावर उत्तर शोधावयाचे असेल त्यांना धर्मचिकित्सा करणे अपरिहार्य ठरते. म्हणूनच 'धर्मचिकित्सा ही सर्व चिकित्सांचा पाया आहे.' स्त्रियांच्या विविध समस्यांचे मूळ धर्मात असल्याने धर्मचिकित्सा होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर समता, विज्ञाननिष्ठ व सत्याचा आग्रह धरणाऱ्या अनेक स्त्रियांनी आजच्या काळाला अनुसरून धर्मचिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व वैचारिक घुसळणीतून समोर आलेले नवनीत म्हणजे 'कल्चरली करेक्ट' हे पुस्तक आहे. हे पुस्तक वाचत असताना एक प्रकर्षाने जाणवते, की बौद्ध धम्माकडे जाणाऱ्या वाटेवर आज स्त्रियाही मागे नाहीत. उलट आजच्या स्त्रियांना

बुद्धधर्म, बुद्धविचार जास्त जवळचा वाटतो. संस्कृतच्या प्राध्यापक असणाऱ्या डॉ. रूपा कुळकर्णींपासून समाजकार्य करणाऱ्या डोंबारी-कोल्हाटी समाजातील शैला यादव पर्यंत सर्वांना बुद्ध आपला वाटतो. तर कधी पारधी वस्तीच्या पालातही तो स्वीकारला जातो, हे महत्त्वाचे!

पुस्तकाच्या सुरुवातीला संपादकीय विवेचनातूनच पुस्तकाच्या अंतरंगाची, त्याच्या वैचारिक बांधणीची, समाजातील प्रस्थापित रचनेमधून एका नव्या मार्गाकडे होणाऱ्या प्रवासाची कल्पना येते. बुद्ध, त्यांचा आचारधर्म, त्यांचा स्त्रीविचार आणि त्या बुद्धविचाराच्या वाटेवर होणारा स्त्रीमुक्तीचा प्रवास येथे अधोरेखित होतो.

धर्म हे समाजक्रांतीचे अधिष्ठान असले पाहिजे, ही धर्माबाबतची नवी संकल्पना सर्वप्रथम गौतम बुद्धांनी जगाला दिली. ती वास्तवात आणून दाखवली. बुद्धांनी नेहमी हेच सांगितले, की मी सर्वश्रेष्ठ सत्य सांगत आहे, परंतु तुम्ही ते सत्य स्वतःच्या विवेकबुद्धीने तपासून घ्या. ज्याप्रमाणे सुवर्णाचे सर्वांगीण परीक्षण करून पंडित म्हणजे शहाणा मनुष्य सुवर्ण घेतो, तसे मी सांगितलेला उपदेश परीक्षून घ्या. घर्षण वा छेदन करून वा अग्निदाह म्हणजे भट्टी लावून सुवर्ण घेतात, तसा माझा उपदेश तपासून घ्या. शब्दप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्य मानणाऱ्या काळात स्वत: बुद्ध आपला उपदेश तपासून, पारखून स्वीकारण्यास सांगत आहेत, हेच बुद्धांचे माहात्म्य आहे, बौद्ध धर्माचे वैशिष्ट्य आहे.

खरेतर बुद्धधम्माने सर्वात प्रथम स्त्रियांना आपल्या अस्मितेची जाणीव करून दिली. त्यामुळे या बुद्ध विचारात समरस झालेल्या 'गेल आल्वेट' आपल्या लेखात म्हणतात, धम्म हा मुक्तिवादी, समग्र मुक्तिग्रामी आहे. स्त्रियांच्या मुक्तीसाठी वैचारिक, नैतिक, भावनिक अशा सर्वच बाजूंनी आणि तत्त्वज्ञानाच्या अंगाने स्त्रियांना कृतिप्रवण करणारा असा हा धम्म आहे. म्हणूनच बुद्धाच्या मार्गाने जाण्याची कधी नव्हे तेवढी गरज आजच्या विचारी स्त्रियांना वाटू लागली आहे. खरेतर बौद्ध धम्म हाच भारताचा खरा सांस्कृतिक वारसा आहे, याची जाणीव आज प्रकर्षाने होताना दिसत आहे. म्हणूनच बहुजन, दलित आणि सर्व समाजातील वंचित घटक आज पुन्हा एकदा बौद्ध धर्माकडे वळताना दिसत आहेत.

आजवर धर्म या संकल्पनेने स्त्रियांवर सर्वात जास्त अन्याय केला आहे. त्यांना वंचित ठेवले आहे आणि माणूस म्हणून जगण्याचे हक्कही नाकारले आहेत. मात्र स्त्रीला तिच्यातील मनुष्यत्वाची, स्वत्वाची आणि सत्त्वाची जाणीव करून देण्याचे मूलगामी कार्य सर्वात प्रथम गौतम बुद्धांनी केले. याबद्दल या सर्व स्त्रिया कृतज्ञ आहेत. याविषयी रेश्मा राणे-जाधव आपल्या लेखात म्हणतात, ''हातभर हिरवी कांकणं भरण्याऐवजी स्वतःवर मणभर विश्वास ठेवल्यानं जे काही हाती लागतं ते फार मोठं असतं, हे पटू लागलंय. कपाळावर भलं मोठं कुंकू लावण्याऐवजी बुद्धाची विवेकी स्थितप्रज्ञता मनावर कोरल्याने जे काही गवसेल ते अवर्णनीय असेल, यात आता तीळमात्रही शंका उरलेली नाही. ओठ-गाल रंगाने रंगविण्याऐवजी अष्टांग मार्गाचे रंग देह-मनाला व्यापून राहिले तर त्यातून निर्माण झालेलं अस्तित्व आकाशालाही गवसणी घालेल, हे आता लक्षात आलय.'' यातून बुद्धविचार या स्त्रियांना किती महत्त्वाचा वाटतो, ते लक्षात येते. असा विचार करणाऱ्या, मुक्ततेसाठी बुद्धविचाराची कास धरणाऱ्या या स्त्रिया खऱ्या अर्थाने परिवर्तनशील आहेत असं वाटतं. ही बुद्धविचारांची चळवळ ज्या स्त्रियांनी आपल्यामध्ये रुजवली, वाढवली तीच भूमिका भारतातील समस्त स्त्रियांनी स्वीकारायला काहीच हरकत नसावी. कारण हा बुद्ध विचार म्हणजे माणसाला माणसाकडे, मानवधर्माकडे घेऊन जाणारा विचार आहे, असे वाटते.

आधुनिक भारतातील स्त्रीमुक्तीच्या पाऊलखुणा शोधताना फुले-आंबेडकरांच्या विचाराचे धागेदोरे तपासत आपणाला पुन्हा बुद्धांपर्यंतच जावे लागते. याबद्दल या ग्रंथातील सर्व लेखिकांचे निश्चितच एकमत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रियांच्या मुक्तीसाठी लढणारे योद्धा होते. ज्यांनी स्त्रियांना शिक्षण, कायदा आणि चळवळ अशी शस्त्रे बहाल केली. त्याचाच आधार घेऊन आजही सर्व स्त्रिया प्रबुद्धतेच्या दिशेने वाटचाल करीत आहेत.

या वाटचालीचा मागोवा आपल्या मनोगतातून घेणाऱ्या स्त्रियांमध्ये डॉ. रूपा कुळकर्णी, डॉ. गेल ऑम्वेट, डॉ. संबोधी देशपांडे, ॲड. वर्षा देशपांडे,

प्रियांका उपरे, सीमा पाटील, डॉ. अर्चना गणवीर या जशा चळवळीत उतरून स्त्रियांसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्या आहेत तशाच कविता मोरवडकर, शारदा नवले, डॉ. भावना राठोड, डॉ. वंदना महाजन यांसारख्या साहित्य क्षेत्रातील महिलाही आहेत. शिक्षण, पत्रकारिता, समाजकार्य, वैद्यकीय क्षेत्र, कला अशा विविध क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवणाऱ्या या प्रज्ञावंत स्त्रियांची मनोगते बौद्ध धम्माबद्दल एक वेगळी जाणीव निर्माण करून देतात. धम्माकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी देतात. त्याचवेळी वाचकांना अंतर्मुख करून जातात.

या पुस्तकात समाविष्ट झालेल्या सर्वच स्त्रियांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे, असे नाही. काहींनी हा धर्म स्वीकारला आहे, तर काहीजणी त्या मार्गावर आहेत. पण काही स्त्रिया बुद्धधम्म आचरणाला अधिक महत्त्व देताना दिसतात. स्त्रीमुक्ती आणि स्त्रीभ्रूण हत्या याविषयी काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या वर्षा देशपांडे 'बौद्ध धम्माचे कृतिशील अनुसरण करते आहे' या लेखात म्हणतात, औपचारिक स्वरूपात बौद्ध धम्माची दीक्षा घेणं मला गरजेचं वाटत नाही. बुद्धिप्रामाण्यवाद जोपासणं, समतेचे तत्त्व जीवनात प्रत्यक्ष अंगीकारणं, विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवणं या धम्माच्या गोष्टी मी प्रत्यक्ष आचरणात आणते आहे. म्हणजेच बौद्ध धम्म हा विवेकवाद शिकविणारा धर्म आहे. मात्र तो कृतिरूपानं पाळला तर!

आणखी एक गोष्ट नमूद करणे महत्त्वाचे वाटते, ते म्हणजे आजपर्यंत भारताच्या प्रगतिकारक वाटचालीमध्ये स्त्रियांनी आपला वाटा उचलला आहे. इतिहास याला साक्षी आहेच, पण आज या पुस्तकाच्या माध्यमातून बुद्धविचारातून प्रगतीकडे जाणारी स्त्रियांची भविष्यातील वाटचाल देखील येथे अधोरेखित होताना दिसते. स्त्रियांच्या प्रगतिकारक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा हा धम्मविचार आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. यासंदर्भात डॉ. वंदना महाजन म्हणतात, बुद्ध वाटेवरचा प्रवास ही सातत्याने घडत जाणारी वैचारिक प्रक्रिया आहे. माणसाचे प्रगल्भ होत जाणे किती आनंददायी असू शकते याची प्रचिती म्हणजे बुद्ध विचार!

म्हणूनच पुस्तकाचे 'कल्चरली करेक्ट' हे नाव अधिक योग्य वाटते. पुस्तकाचे मुखपृष्ठ तर बोलके आहेच पण मलपृष्ठावरील मांगल्याची ही विश्वव्यापी जाणीव हेच बौद्ध धम्माचे खरेखुरे अंतरंग आहे, म्हणूनच मी बुद्धाकडे चालले आहे हे विचार अधिक प्रेरणादायी वाटतात. या पुस्तकातील स्त्रियांची ही मनोगते म्हणजे भविष्यातील स्त्रीमुक्तीची नांदीच म्हणता येईल. किंबहुना आपल्या एकूणच मानव समाजाच्या उद्धाराची बीजे बुद्ध तत्त्वज्ञानात सामावलेली आहेत असे वाटते. म्हणूनच पुरोगामी आणि परिवर्तनवादी विचार करणाऱ्या प्रत्येकाने हे पुस्तक वाचलं पाहिजे. मानव मुक्तीच्या वैचारिक पूर्वजाशी स्वतःला जोडून घेतले पाहिजे, असे मला वाटते.

(लेखिका आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर येथे कार्यरत आहेत.)

पुस्तकाचे नाव: कल्चरली करेक्ट
संपादक: संदीप सारंग, डॉ. वंदना महाजन
ग्रंथाली प्रकाशन
पृष्ठे :४०० मूल्य : रू.४००

## रक्तदान शिबिर



**कोल्हापूर :** बकरी ईदनिमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा व या प्रथेला पर्याय म्हणून रक्तदान अभियान दरवर्षी राबवले जाते. यावर्षी कोल्हापूर अंनिस व अनुभव शिक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० जुलै २०२२ रोजी सीपीआर रक्तपेढी येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वीसहून अधिक रक्तदात्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला. रामदास देसाई, राहुल सुतार, तुषार चोपडे, शाहीर रणजित कांबळे, कृष्णात स्वाती, इम्रान मुल्ला, संदीप सावंत, दिनेश परीट, स्वाती कृष्णात, नानाजी सूर्यवंशी, समाधान जाधव, स्वप्नील काळे, वैशाली कांबळे, स्मिता कांबळे आदींनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे नियोजन निशांत शिंदे, प्रमोद शिंदे, गौतम कांबळे यांनी केले. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडीया, कपिल मुळे या प्रसंगी उपस्थित होते.

# सायन्स फॉर सोसायटी, उत्तराखंड

गिरीश आर्या
९४५६१३२५६४

समाजात पसरलेल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी आणि जनतेत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याच्या उद्देशाने जानेवारी २०२० मध्ये उत्तराखंड येथील काही जागरूक नागरिकांनी 'सायन्स फॉर सोसायटी उत्तराखंड' ही संघटना स्थापन केली. स्थापना झाल्यापासूनच 'सायन्स फॉर सोसायटी' उत्तराखंडमध्ये आणि विशेषतः नैनीताल जिल्ह्यातील काही विभागात अंधश्रद्धा आणि बुवाबाजीच्या विरोधात तसेच समाजमानसात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, दिल्ली येथेही काही जागरूक नागरिकांनी 'सायन्स फॉर सोसायटी'च्या या मोहिमेला पुढे नेण्यासाठी बैठकीच्या अनेक फेर्‍या आयोजित केल्या आहेत. 'सायन्स फॉर सोसायटी'च्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या या मोहिमेला 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' तसेच 'तर्कशील सोसायटी पंजाब, हरियाणा' यांच्याकडून सदैव सहकार्य आणि समर्थन मिळत आले आहे.

ऑगस्ट २०१९मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्थापनेच्या त्रिदशकपूर्तीनिमित्त मुंबईत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय आणि राज्यस्तरीय अधिवेशनात उत्तराखंडच्या अर्ध्या डझनहून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला होता. या तीन दिवसीय अधिवेशनास देश-विदेशातील विविध भागातून आलेल्या मान्यवरांशी उत्तराखंडच्या साथींनी संवाद साधला. मुंबईहून परत आल्यावर उत्तराखंडमधील रामनगर शहरातून 'सायन्स फॉर सोसायटी'चा प्रारंभ करण्यात आला. मुंबईत भेटलेल्या 'तर्कशील सोसायटी पंजाब'च्या प्रतिनिधींनीसुद्धा उत्तराखंडमध्ये अंधश्रद्धेच्या विरोधात आणि जनतेत वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य सुरू करण्यासाठी संपूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

जानेवारी २०२०मध्ये तर्कशील सोसायटी पंजाबचे रामकुमार आणि हरचंद यांच्या सहकार्याने रामनगर येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत पंजाबच्या साथींनी जादूटोण्यामागील विज्ञानाचे विश्लेषण करून कार्यशाळेस उपस्थित असलेल्या चाळीसपेक्षा अधिक प्रतिनिधींना प्रशिक्षित करण्याचे काम केले. कार्यशाळेनंतर मालधन चौड येथील इंटर कॉलेज आणि बुक्सा-जमात-बहुल थारी या गावात अंधश्रद्धा दूर करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या आयोजनानंतर उत्तराखंडमधील काही क्षेत्रांमध्ये 'सायन्स फॉर सोसायटी'च्या वतीने अंधश्रद्धा दूर करण्यासाठी, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी निरंतर कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे.

सूर्यग्रहण आणि चंद्रग्रहणाच्या बाबतीतदेखील जनतेत आत्यंतिक अंधश्रद्धा आणि अज्ञान आहे. सूर्यग्रहणाच्या काळात मोठ्या संख्येने लोक घरात स्वतःला कोंडून घेतात आणि ग्रहणकाळात जेवण व पाणीसुद्धा घेत नाहीत. लोकांमध्ये अशी अंधश्रद्धा आहे की, राहू आणि केतू या नावाचे दोन राक्षस सूर्याला गिळतात म्हणून ग्रहण लागते. लोकांमधील या अंधश्रद्धेचे निर्मूलन करण्यासाठी रामनगर, नैनीताल जिल्ह्यातील लोद गाव आणि उधमसिंहनगर येथील नुवार मंडी येथे २१ जून २०२० रोजी सूर्यग्रहणाच्या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांना हे समजावून सांगण्यात आले की, सूर्यग्रहण हे कोणा राक्षसामुळे लागत नाही तर आपल्या निश्चित वेळेनुसार घडणारी ती केवळ एक खगोलीय घटना आहे. जनतेला हे समजावून सांगण्यात आले की, सूर्य, चंद्र आणि पृथ्वी एका सरळ रेषेत आल्यामुळे आणि चंद्र मध्ये आल्याने सूर्य झाकला जातो आणि सूर्यग्रहण लागते.

सूर्यग्रहण उघड्या डोळ्यांनी बघितल्यास डोळ्यांवर वाईट परिणाम होऊ शकतो. म्हणून, लोकांना सूर्यग्रहण दाखविण्यासाठी वेल्डिंग करताना डोळ्यांसमोर धरण्यात येणारी काच तसेच बुटाच्या बॉक्समध्ये पिन-होल तंत्राचा वापर करण्यात आला. सूर्यग्रहणात अन्न अशुद्ध होते ही अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सर्वांसमक्ष चहा बनवून

अल्पोपहाराचे आयोजन देखील करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विशेषतः मुला-मुलींमध्ये उत्साह संचारला होता.

सूर्यग्रहण काळात आयोजित केलेल्या कार्यक्रमास 'महाअंनिस'चे उत्तम जोगदंड आणि अमोल चौगुले यांचे विशेष सहकार्य लाभले.

मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आणि जनतेला समाजातील खर्या नायकांचा परिचय करून देण्याच्या उद्देशाने शाळा, गाव आणि शहरांमध्ये व्याख्याने, चित्रकला आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांचेही आयोजन केले जात आहे. शहीद भगतसिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, देशातील पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले, इटलीचे विचारवंत, वैज्ञानिक ब्रुनो इत्यादींवर वेगवेगळ्या ठिकाणी प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन केले गेले. या प्रश्नमंजुषा आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करताना मुलांकडून रु.१० नोंदणी शुल्क आकारून त्यांना वाचनासाठी एक लेख दिला जातो. या लेखाच्या आधारावर बनवलेल्या प्रश्नपत्रिकेवर मुलांची परीक्षा घेतली जाते. बरोबर उत्तरे देऊन जास्तीत जास्त गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार म्हणून पुस्तके आणि स्टेशनरी दिली जाते. शिवाय स्पर्धेत भाग घेणार्या सर्व विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पुरस्कार दिला जातो. या कार्यक्रमाच्या दरम्यान जादूटोण्यामागील विज्ञानाची माहितीदेखील दिली जाते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून येणार्या पिढीला देश-विदेशाच्या भल्यासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या महापुरुषांच्या कार्याचा परिचय होतो.

गेल्या वर्षी एप्रिल महिन्याच्या सुरूवातीला आलेल्या कोरोनाच्या दुसर्या लाटेदरम्यान देशातील आरोग्यसेवा अत्यंत वाईट पद्धतीने कोलमडून पडली होती. जनतेला केवळ कोरोनाच नाही तर अन्य आजारांवरही इलाज करण्यासाठी डॉक्टर्स उपलब्ध नव्हते. उपचारासाठी नाईलाजाने लोकांना दारोदार हिंडावे लागत होते. जनतेच्या वैद्यकीय चिकित्सेसंबंधीचा हा त्रास पाहून 'सायन्स फॉर सोसायटी'च्या वतीने चार डॉक्टरांची एक मेडिकल हेल्पलाइन सुरू करण्यात आली. या हेल्पलाईनच्या माध्यमातून रुग्णांना निःशुल्क सल्ला व सेवा उपलब्ध करून देण्यात आली. लवकरच या 'हेल्पलाइनला' तर्कशील सोसायटी पंजाब, हरियाणा'ची देखील साथ लाभली आणि देशातील नामांकित १४ ॲलोपॅथिक चिकित्सकांनी या हेल्पलाइनला जोडून घेतले आणि सकाळी ७.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत रुग्णांना मोफत सल्ला देऊ लागले. हेल्पलाइनच्या वतीने काही गरीब रुग्णांना औषधे इत्यादी उपलब्ध करून देण्यात आले. काही दूरवरील ग्रामीण भागांमध्ये टेंपरेचर गन, ऑक्सीमीटर इत्यादीसुद्धा उपलब्ध करून देण्यात आले.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५१ मध्ये नागरिकांची कर्तव्ये दिलेली आहेत. संविधानाच्या अनुच्छेद ५१(ए)एच अनुसार वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधक बुद्धी याचा अंगीकार करणे हे सर्व नागरिकांचे मूलभूत कर्तव्य मानले गेलेले आहे. परंतु देशातील सरकारे, शिक्षण व्यवस्था आणि मीडिया आपल्या या संवैधानिक कर्तव्याचे पालन करण्याऐवजी जनतेत अंधश्रद्धा आणि कर्मठपणाच पसरवीत आहे. विज्ञान आणि आधुनिक तंत्राचा उपयोग, जनतेला वैज्ञानिक दृष्टीकोनाने सुसज्ज करण्याऐवजी त्यांना अंधश्रद्धेच्या आणि कर्मठपणाच्या दलदलीत ढकलले जात आहे.

काही राजकीय पक्ष राजरोसपणे आपल्या आयटी सेलचे गठन करून व्हॉट्सॲप आणि समाजमाध्यमांतून अवैज्ञानिक आणि अज्ञानमूलक साहित्य प्रसिद्ध करून जनतेला खाईत लोटण्याचे काम करीत आहेत. वृत्तपत्रे-मासिके आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचा एक मोठा भाग अंधश्रद्धा वाढवणारे आणि जनतेची जाणीव बोथट करणारे कार्यक्रम प्रसारित करण्यात मागे नाहीत. अशा वेळी समाजातील पुरोगामी लोकांची ही जबाबदारी आहे की, त्यांनी लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. लोकांना कर्मठपणा आणि बुवाबाजीच्या शोषणातून मुक्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले पाहिजे.

(लेखक सायन्स फॉर सोसायटीचे सदस्य आहेत.)

(मराठी अनुवाद : उत्तम जोगदंड)

●



# कार्याध्यक्ष संवाद

माधव बावगे
९४०४८७०४३५

साथींनो, शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या पठडीत घडलेले आपण कार्यकर्ते आहोत. चळवळ आणि चळवळीचा विवेकी विचार आपल्या हाडामांसात, रक्तात भिनला आहे. आपल्या सर्वांच्या कार्यकर्तृत्वामुळे सामाजिक क्षेत्रात अत्युच्च शिखरावर पोहोचलेल्या चळवळीसोबत राहात संघटनात्मक आणि आर्थिक पाठबळ उभे केलात. याबद्दल मला आपला सार्थ अभिमान वाटतो.

साथी, अजूनही संक्रमण काळ संपलेला नाही. आता तर आपल्या सर्वांच्या अधिक कसोटीचा काळ आहे. आपल्याला आपल्या कामाची रेषा वाढवून कामातूनच उत्तर द्यायचे आहे. मागील दोन वर्षांचा कोरोना काळातील कामाचा बॅकलॉग भरून काढणे, ही आपली अधिकची जबाबदारी आहे. हे काम एकट्या-दुकट्याचे नाही. सामूहिकपणे एकजुटीने करायचे काम आहे. संघटनेचे काम वाढले, उपक्रम वाढले, कामाची अनेक दालने खुली झाली, हे आपल्या सर्वांच्या सामूहिक परिश्रमाचे श्रेय आहे. भूत, भानामती, बुवाबाजी विरोधापासून सुरू झालेले काम संघटनेने शास्त्रीय विचारपद्धती, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मचिकित्सा, विवेकवाद ते मानवतावादापर्यंत यशस्वीरित्या पोहोचवले आहे.

आपल्या संघटनेसमोर आजही अनेक नवनवीन आव्हाने आहेत. त्याबाबत चिंतन करावे लागेल. पुढचा भविष्यवेध ठरवावा लागेल. आपणास जबाबदाऱ्या वाटून घ्याव्या लागतील, त्या वेळेत पूर्ण कराव्या लागतील. आर्थिक पाठबळ वाढवावे लागेल, तरच आपण पुढे जावू शकू. डॉ. दाभोलकर म्हणायचे की, ''ही दशकांची लढाई नाही तर ती शतकांची लढाई आहे''. आपणास न थकता, निराश न होता, सतत लढत राहावे लागेल. समूहाने काम करत असताना राग, लोभ, द्वेष, व्यक्तिगत हेवेदावे, महत्त्वाकांक्षा, अहंकार, आत्मप्रौढी यांमुळे चळवळीच्या कामाला खीळ बसण्याची शक्यता असते. आपण सर्वांनी या बाबी संघटनेच्या कामात अडथळा ठरणार नाहीत याची काळजी घेऊ या. समज-गैरसमज समोरासमोर बोलून दूर करून संघटनात्मक कामाला महत्त्व देऊ या आणि संघटनेला सामूहिकपणे अत्युच्च शिखरावर पोहोचवण्याचा निर्धार करूया.''

साथी, आपण नवनवीन संकल्पना मांडाव्यात आणि त्या निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी संकल्पित व्हावे ही रास्त अपेक्षा आहे. आपल्या जिल्ह्यात शाखा व जिल्हा कार्यकारिणी करून मध्यवर्तीकडे वेळेत पाठवणे, नियमित बैठका घेणे, कार्यकर्त्यांना व शाखांना नियमित भेटी देणे, विविध उपक्रम प्रभावीपणे राबवणे आदी जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याचा संकल्प करूया. उपक्रमांचे दस्तऐवज अद्ययावत होईल याची काळजी घेत संघटनेची स्वयंशिस्त पाळत मिळून काम करू या.

दि. ९ ऑगस्ट हा संघटनेचा ३३वा वर्धापन दिन आपणासाठी उत्साहाचा आणि आनंदाचा दिवस, तर दुसऱ्या बाजूला शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाला दि.२० ऑगस्ट २०२२ रोजी ९ वर्षे पूर्ण होत आहेत. तरीही त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा होवू शकलेली नाही, ही दुखःद बाब. याबरोबरच कष्टकरी, कामगारांचे नेते कॉ. गोविंद पानसरे, बसव साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. एम. एम. कलबुर्गी, निर्भीड पत्रकार गौरी लंकेश यांचेही खून सनातनी प्रवृत्तीकडून झाले. त्यांच्याही खुनाच्या तपासाबाबत सरकारची उदासीनता दिसून येत आहे. देशात कायद्याचे राज्य आहे की धार्मिक उन्मादाचे, अशी शंका निर्माण होण्यासारखं समाजवास्तव आहे. खुनाच्या तपासातील दिरंगाईचा तीव्र निषेध करणे आणि सांविधानिक पद्धतीने याविरोधात आवाज उठवत राहण्याशिवाय आपल्याकडे दुसरा कोणताच पर्याय नाही.

अंनिस आणि ऑल इंडिया पिपल्स सायन्स नेटवर्कच्या संयुक्त विद्यमाने २० ऑगस्ट हा दिवस आपण राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस म्हणून कृतिशीलपणे साजरा करत आहोत. दि.२० ऑगस्ट ते २१ सप्टेंबर (चमत्कार सत्यशोधन दिन) दरम्यान वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी करण्यासाठी शाखा, जिल्हा तसेच राज्यपातळीवर प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन आपण करीत आहोत. कार्यक्रमाच्या नियोजन आणि संयोजनात कृतिशीलपणे आपण सहभाग नोंदवावा, हीच अपेक्षा.

आम्ही वारस विवेकाचे!
विवेकाचा आवाज बुलंद करू या!



# महाराष्ट्र अंनिसची खबरबात



अनिल शोभना वसंत
९८२३२८०३२७

## राष्ट्रीय अधिवेशनात महाअंनिसचा सहभाग





ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्कचे राष्ट्रीय अधिवेशन दि. ६ ते ९ जून २०२२ दरम्यान भोपाळ येथे पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन वरिष्ठ पत्रकार पी. साईनाथ, केरळच्या आरोग्यमंत्री के.के. शैलजा आणि संशोधक इंदुमती यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. विज्ञान संप्रेषण या चर्चासत्रामध्ये महाअंनिसचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे कार्यवाह प्रा. सुदेश घोडेराव यांनी सहभाग घेतला. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि रसायन विज्ञानातील आवड निर्मितीसाठी रासायनिक चमत्कारांचा अभ्यासक्रमात समावेश करावा असे आवाहन त्यांनी केले. भोंदूगिरी, छद्मविज्ञान, सांप्रदायिकता, हिंसा, शेतकऱ्यांवरील अन्याय इत्यादी विरोधात रचनात्मक व संविधानिक मार्गाने लढत राहाण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ऑनलाईन वेबिनार

**मुंबई** : दि. १५ जून २०२२ रोजी के. सी कॉलेज, चर्चगेट येथे The Prudent Choice of Mate या कार्यक्रमाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. महाअंनिसच्या सुशीला मुंडे यांनी सादर केला. या कार्यक्रमास कॉलेजच्या प्राचार्य सिन्हा, समन्वयक प्रा.पाखरे, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पीपीटीच्या माध्यमातून अतिशय सहज सुलभ आणि सोप्या भाषेमधून हा विषय मुलांना समजावून देण्यात आला. या विषयातील विविध कंगोरे, जबाबदाऱ्या, पार्टनरकडे बघण्याचा दृष्टिकोन, विवाहाच्या पद्धती, महाराष्ट्र अंनिस सत्यशोधक विवाह पद्धतीनिमित्त करत असलेले काम या सगळ्या गोष्टींच्या अंगाने चर्चा घडवून आणली.

## जटा निर्मूलन



**पुणे** : शिवाजीनगर शाखेच्या पदाधिकारी माधुरी गायकवाड आणि राज्य पदाधिकारी विशाल विमल यांनी शनिवार पेठेतील जट असलेल्या मावशीचे समुपदेशन केले. नवरा जिवंत असताना केस कापणे योग्य नाही अशी काहीशी मावशींची मते होती. 'तुम्ही लवकर यातून तिची मुक्तता करा', असे त्यांच्या पतीने सांगितले. काकांनी स्वतःहून लेखी स्वरूपात अर्जही दिला की, जटा कापून पत्नीला मुक्त करावे. नम्रता ओव्हाळ, माधुरी गायकवाड, मयूर पटारे, परिक्रमा खोत यांनी जट कापून अनिष्ट प्रथेचे निर्मूलन केले.

## 'होय, मी समतावादी' संवाद अभियान

**पनवेल** : महा. अंनिस शाखा पनवेल महिला सहभाग विभागामार्फत 'होय, मी समतावादी' संवाद अभियान दि.९ ते १३ जून २०२२ दरम्यान राबवण्यात आले. या अभियनांतर्गत शाखेच्या कार्यकर्त्यांनी पनवेलमधील अनेक ठिकाणी भेट देऊन विधवा प्रथा बंदीबाबत लोकांसोबत संवाद साधला. कुंकू-मंगळसूत्रासारखे अलंकार घालण्याचा किंवा न घालण्याचा चॉईस, त्यातून स्त्रियांवर लादलेले भेदाभेद आणि नवऱ्याच्या अस्तित्वावर स्त्रीची प्रतिष्ठा अवलंबून असणे, या आणि अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. चर्चेनंतर ज्यांनी सकारात्मक मतं व्यक्त केली, त्यांना त्याच मुद्द्यांवर आधारित एक शपथपत्र देऊन त्यासोबत त्यांचे फोटो शाखेच्या फेसबुक पेजवर टाकण्यात आले. सोबत गुगल फॉर्मच्या रूपात एक प्रश्नावली तयार करून सोशल मीडियावर पसरवण्यात आली. या अभियानाच्या माध्यामातून शंभरहून अधिक लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात कार्यकर्त्यांना यश आले. यापैकी सत्त्याऐंशी लोकांनी विधवा प्रथा बंदी आणि त्यांच्याशी समान वागणुकीबाबत सकारात्मक मतं नोंदवली.

### माहिती पाठवण्याचे आवाहन

**'महाराष्ट्र अंनिस खबरबात' सदरासाठी दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शाखांनी उपक्रमांचे फोटो, मजकूर पाठवावेत.**
**संपर्क : अनिल करवीर :९८२३२८०३२७**
karviranil@gmail.com

## संविधान संवाद कार्यक्रम




**कुर्ला** : १२ जून २०२२ रोजी संविधान संवाद कार्यक्रम कुर्ला शाखा व युथ कट्टा यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमात राजवैभव शोभा रामचंद्र याने उपस्थितांशी संवाद साधला. संविधान आपल्या दैनंदिन जीवनाशी कशाप्रकारे जुळले आहे हे उदाहरणांसहित समजावून सांगितले. तसेच २५ जून २०२२ रोजी मॅरेथॉन/ सायक्लोथॉन – स्वापक नियंत्रण ब्युरो, भारत सरकार, मुंबई, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सलाम मुंबई फाऊंडेशन व ऑल इंडिया नशामुक्त अभियान (INA) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमली पदार्थ सेवनविरोधी दिनानिमित्त Say No To Drug's, Yes To Life स्पर्धेत कुर्ला शाखा सहभागी झाली होती.

## कार्यकर्त्यांसाठी चमत्कार प्रशिक्षण

**पुणे** : महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर शाखेने एकदिवसीय चमत्कार प्रशिक्षणाचे आयोजन दि. ३ जुलै २०२२ रोजी केले होते. या प्रशिक्षणात ४५ पेक्षा अधिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. कागदात बसलेले तथाकथित भूत जाळून या प्रशिक्षणाचे उद्घाटन विज्ञानबोध वाहिनीचे राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे यांनी केले. अत्यंत रंजक पद्धतीने सदाकळे यांनी चमत्कारांचे सादरीकरण केले. प्राचार्य मच्छिंद्रनाथ मुंडे यांनी चमत्कारामागील वैज्ञानिक कारणे, हातचलाखी, रासायनिक घटकांचा वापर व सादरीकरणातील सफाईदारपणा उलगडून दाखवला. विशाल विमल यांनी समारोपाच्या सत्रात चमत्कार सादरीकरणातून होणारे प्रबोधन व चमत्कारामागील कार्यकारणभाव याचा संघटनेच्या कामाच्या पंचसूत्रीशी असलेला संबंध स्पष्ट केला.



## जिल्हा मेळावा

**मुंबई** : रविवार दि. २६ जून२०२२ रोजी भांडूप येथे मुंबई जिल्ह्याचा मेळावा संपन्न झाला. सुरुवातीला नूतन राज्य कार्यकारिणीमध्ये निवड झालेले राज्य प्रधानसचिव नंदकिशोर तळाशिलकर, राज्य सरचिटणीस विजय परब, सचिन थिटे आणि मुंबई जिल्हा कार्याध्यक्ष नरेंद्र राणे यांचे अभिनंदन करण्यात आले. निर्मला माने आणि नंदना यांनी अभिवादन गीत सादर केले. नियमित बैठका आणि उपक्रम हे नवीन कार्यकर्ते जोडून घेण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे मत चर्चेअंतीपुढे आले. सचिनने विस्तारित राज्य कार्यकारिणीचा वृत्तांत सांगितला आणि आगामी काळासाठी काही संकल्पना/उपक्रम यासाठी चर्चा खुली केली. मुंबई जिल्हा महिला कार्यवाह नंदनाने पुरुषांनी आपल्या जोडीदाराला मिटिंगमध्ये आणावे; तसेच घरातील इतर महिला सदस्यांना आणण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले. महिन्यातून एक जिल्हा बैठक घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले. रुपेश, नंदना, रेश्मा, निर्मला माने, शहाजी पाटोदेकर, मारुती पालशेतकर, नरेंद्र राणे, विजय सुर्यवंशी, रितेश, सचिन, यश, प्रसाद, रुपेश, चिन्मय, प्रवीण, गणेश, सुबोध आदी उपस्थित होते.

## भावपूर्ण आदरांजली



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे धडाडीचे कार्यकर्ते बिपीन रणदिवे (डोंबिवली) यांचे १५ जुलै रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या स्मृतींप्रती महा. अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली!

बिपीन रणदिवे हे एक प्रसन्न, विनोदी आणि धाडसी व्यक्तिमत्व होते. अंगावर घेतलेली जबाबदारी झपाटल्यागत पूर्ण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या.

# सामाजिक न्याय दिन राज्यभर साजरा

**कोपरखैरणे**: नवी मुंबई शाखेतर्फे



कोपरखैरणे शाखेतर्फे मा. गजानंद जाधव यांचे 'राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक कार्य' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. समाज धार्मिकता आणि अनिष्ट रूढी-परंपरांच्या विळख्यात अडकलेला असताना त्याला सकारात्मक परिवर्तनवादाच्या वाटेवर आणण्याचे काम राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अमोल खिलारे यांनी सक्तीचे आणि मोफत शिक्षण या संकल्पनेचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज असल्याचे सांगितले. अशोक निकम या प्रसंगी उपस्थित होते.

**निमगूळ शाखा** : निमगूळ (धुळे) ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून जनजागृती उपक्रम राबविला. राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त विधवा अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी महा.अंनिस तर्फे



ग्रामस्थांच्या साहाय्याने जनजागृती करण्यात आली. म. अंनिसचे कार्यकर्ते दिलीप खिवसरा यांनी याबाबतीत जनजागृती केली.

**चामोर्शी :** चामोर्शी (गडचिरोली) शाखेतर्फे सामाजिक न्यायदिनाचा कार्यक्रम जिल्हा विकास संशोधन व कार्यान्वयन संस्था गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक वाचनालय येथे घेण्यात आला.



**गडचिरोली :** महा.अंनिस शहर शाखेच्यावतीने पार पडलेल्या सामाजिक न्यायदिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हा सचिव मा.पंडित पुडके होते. प्रा. डॉ. अनिल चहांदे, दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी मिलिंद उमरे, कविवर्या कुसुमताई अलाम, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे आदी उपस्थित होते.

**म्हसळा :** २६ जून२०२२ रोजी म्हसळा (रायगड) शाखेच्यावतीने राजश्री शाहू महाराज जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सानेगुरुजी वाचनालय (भापट) येथे जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे यांनी शाहू महाराज यांची सामाजिक न्यायाची भूमिका आणि सध्याचा सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा व जादूटोणाविरोधी कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वैज्ञानिक जाणिवा कार्यवाह प्रमोद भांजी यांनी 'शाहू महाराज आणि शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी १०वी आणि १२वी गुणवंत विद्यार्थी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयसिंग बेटकर यांनी केले. यावेळी वृक्षारोपणदेखील करण्यात आले.


**कोल्हापूर :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व बसव केंद्र यांच्यावतीने सामाजिक न्यायदिन हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसव केंद्राचे बाबुराव तारळी होते. राजर्षी शाहू महाराजांना राज्यकारभारासाठी मिळालेल्या अल्पकाळात त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया रचला. सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर अवलंबून असलेला विकासाचा मार्ग त्यांनी निर्माण केल्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे मत प्रा. राजेश पाटील यांनी मांडले.

# शाखा भेटीचे आयोजन

**जळगाव** : प्रा.दिगंबर कट्यारे यांनी भडगाव, पाचोरा व एरंडोल या शाखांना भेटी दिल्या. जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र चौधरी व प्रधानसचिव सुनील वाघमोडे यांनी पारोळा, चाळीसगाव, खडकी आणि तळेगाव शाखांना तर विश्वजीत चौधरी यांनी भुसावळ, धरणगाव शाखेला भेट दिली. अरुण दामोदर, सागर बहिरुणे, मोहन मेढे आणि अशोक तायडे यांनी वरणगाव, यावल, किनगाव, रावेर, मालखेडा, जामनेर, मुक्ताईनगर या शाखांना भेटी दिल्या. तालुक्यानुसार कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याची गरज या भेटीतून जाणवली. दि.१२ जून २०२२ रोजी राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांच्या उपस्थितीत जळगाव जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची एकत्रित बैठक नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव येथे घेण्यात आली.

– उत्तम जोगदंड

## विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. ३



**आडवे शब्द:**

१) विज्ञानाची एक शाखा
४) उत्सवात ध्वनिप्रदूषण करणारा एक प्रकार
६) कागद चिकटवण्यासाठी बनवला जाणारा चिकट पदार्थ
७) फुप्फुसांना प्रभावित करणारा एक संसर्गजन्य रोग
८) पुरातन–पूर्व काळातील
१०) आनुवांशिक लक्षणे पुढच्या पिढीत नेणारा सूक्ष्म घटक
१२) श्रद्धाळू लोक देवाला खूश करण्यासाठी हा घेतात
१३) वसाहत, ग्राम
१४) प्रसिद्ध भारतीय गणित तज्ज्ञ
१७) एक वाईट मानवी स्वभाव
१८) लोहाराचे अग्नीला प्रज्वलित ठेवण्याचे साधन
१९) पृथ्वीला साधूंनी दिलेले विशेषण
२०) विद्वान, विचारी मनुष्य
२१) ध्वनि
२३) एक ‘महासत्ता’ असलेला देश
२५) रात्री आकाशात दिसणारा तारकांचा पांढरा पट्टा
२६) विषाणूची बाधा

**उभे शब्द**

१) जुन्या वेळ मोजण्याच्या घटिकेचा एक अंश
२) आर्यभट्ट उपग्रहाशी संबंधित भारताचे महान शास्त्रज्ञ
३) आकाशातील चांदण्यांचे पाडलेले २७ भाग
५) सूक्ष्मदर्शकाचा (Microscope) शोध लावणारा शास्त्रज्ञ
६) झाडांच्या, वनस्पतींच्या वाढीसाठी हे आवश्यक असते
९) २४ तासांचा कालावधी
१०) अन्नातील शरीराला आवश्यक असणारी पोषक द्रव्ये
११) महा. अंनिसच्या मुखपत्राचे संक्षिप्त स्वरूप
१३) समुद्राच्या लाटांचा आवाज
१४) संकटात सापडलेला आपला एक शेजारी देश
१५) रस्ता
१६) विसाव्या शतकातील एक कुप्रसिद्ध महिला गुप्तहेर
२०) भारतातील एक नामशेष ऐतिहासिक विश्वविद्यालय
२१) व्याप्ती, मर्यादा
२२) कापडाचा गठ्ठा
२४) यज्ञासोबत हा असतो

**(उत्तर पुढील अंकात)**

## विवेक–विज्ञान शब्दकोडे २ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ब्रा | ह | म | को | वू | र | | ना | टो |
| व | झी | र | | ली | | सा | य | क | ल |
| का | ल | क | थि | त | | य | | | |
| श | | त | | | मा | न | स | शा | स्त्र |
| | ता | | | भि | | शा | | | |
| पा | रा | | अ | न्न | व | स्त्र | नि | बा | रा |
| णी | | गॉ | र्कि | | र | | द्रा | | हू |
| | फ | | मि | सा | ई | ल | | द | ल |
| पा | ण | बु | डी | | | ह | | या | |
| | स | | ज | वा | ह | र | ला | ल | |

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे

# विवेक जागर प्रकाशन

आणि अन्य प्रकाशनाची अंधश्रद्धा निर्मूलन कामाशी संबंधित पुस्तके

## सवलतीच्या दरात घरपोच मिळतील

आम्ही वारस विवेकाचे

**संपर्क : विशाल विमल – ७२७६५५९३१८ , नवल ठाकरे – ८२६२९१८७७५**

**सवलत योजना ३१ ऑगस्टपर्यंत**

- ४ पुस्तकांच्या खरेदीवर ४० टक्के सवलत
- ३ पुस्तकांच्या खरेदीवर ३० टक्के सवलत
- २ पुस्तकांच्या खरेदीवर २० टक्के सवलत
- १ पुस्तकाच्या खरेदीवर १५ टक्के सवलत

पोस्टेज खर्च वेगळा द्यावा लागेल.

| | |
|---|---|
| **चमत्काराचा भुलभुलैय्या**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. २३० रु. |
| **अवयवदान देहदान : भ्रम आणि निर्भ्रम**<br>प्रा. डॉ. सुशील मेश्राम | किं. १३० रु. |
| **मृत्यूनंतरची सुंदर भेट**<br>संपादन : प्रा. डॉ. सुशील मेश्राम | किं. १३० रु. |
| **जोडीदाराची विवेकी निवड**<br>संपादन : आरती नाईक | किं. १३० रु. |
| **जातपंचायतींना मूठमाती**<br>कृष्णा चांदगुडे | किं. २२५ रु. |
| **फलज्योतिष : भ्रमातून वास्तवाकडे**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. २०० रु. |
| **ओळखा नवरत्नांचा विळखा**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ८० रु. |
| **जादुई वास्तव**<br>रिचर्ड डॉकिन्स, अनुवाद : शंतनू अभ्यंकर | किं. २५० रु. |
| **पृथ्वी मोलाचा माणुस**<br>संपा.अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया | किं. ३०० रु. |
| **मला बरं का वाटतं**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. ११० रु. |
| **सफर विश्वाची**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. २०० रु. |
| **असा विचार करायला काय हरकत आहे**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. १२० रु. |
| **यात असे आहे तरी काय ?**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. १२० रु. |
| **अंतराळ समजून घेताना**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ११० रु. |
| **पत्रिका जुळविताना**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ५० रु. |
| **दोस्ती ताऱ्यांशी**<br>डॉ. नितीन शिंदे | किं. ५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन आचार (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन विचार (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **अंधश्रद्धा उन्मूलन सिद्धांत (हिंदी)**<br>डॉ. नरेंद्र दाभोलकर | किं. १५० रु. |
| **प्रयोग चमत्काराचे**<br>मच्छिन्द्रनाथ मुंडे | किं. २५ रु. |

**कार्यालय :** अविनाश पाटील, कार्याध्यक्ष, महा. अंनिस, भास्कर, ६८, कालीकादेवी नगर, संगमा चौक, धुळे–०१.

**सोशल मीडिया मधील हँडल्सना भेट द्या/सबस्क्राईब करा/जॉईन व्हा...**

वेबसाईट : http://mans.org.in

फेसबुक पेज : MaharashtraNiS

इन्स्टाग्राम : @mahaanis_mans

ट्विटर : MahaANIS_MANS

YouTube चॅनल : MNS महा अंनिस

टेलिग्राम : mahaNIS

# कार्यगौरव




महाअंनिसच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अविनाश पाटील यांच्या कार्यगौरव प्रसंगी (धुळे) सुप्रसिद्ध विधीज्ञ उज्वल निकम, कुलगुरू डॉ. विजयकुमार माहेश्वरी, ॲड. एम. एस. पाटील, ॲड. बापूसाहेब जे. टी. देसले, कॉ. किशोर ढमाले, नाटककार शंभु पाटील, आर्किटेक्ट चेतन सोनार, वासंती दिघे, बी.एस.पाटील, डॉ. संजय पाटील आदी उपस्थित होते.




महाअंनिसच्या राज्य कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माधव बावगे यांच्या सत्कारप्रसंगी (लातूर) माजी खा. डॉ जे. एम. वाघमारे, डॉ विठ्ठल लहाने, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रधानसचिव संजय बनसोडे, मनोहर जायभाये, सुधाकर तट, अनिल दरेकर आदी उपस्थित होते.



## अभिनंदन

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांच्या 'जातपंचायतींना मूठमाती' या पुस्तकास परिवर्तन या संस्थेचा पुरस्कार मिळाला. पुरस्कार स्वीकारतांना कृष्णा चांदगुडे. सोबत विचारवंत डॉ. प्रदीप आगलावे, मनपा मुख्याधिकारी अमोल बागुल, प्रा. गंगाधर आहिरे आदी उपस्थित होते.

**Printed Book Post**

**प्रति,** ____________________

**प्रेषक,**

संपादक
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
प्रा. डॉ. नितीन शिंदे
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली - ४१५४०९.

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.